

# Zero to Hero Journey of Amitabh Bachchan

# अमिताभ बच्चन असे घडले



यशराज पारखी

लेखन संकलन : यशराज पारखी

301 Kool homes Bavdhan khurd P1 Behind Maratha Mandir Pune 411021

yeshrajparkhie@gmail.com , yashtrajparkhi@gmail.com

+91-9922604442

+91-9373335922

+91-9922992210

अक्षरजुळणी : संगीता जोशी

- ०२०२४३५२७८८

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# अमिताभ बच्चन -झिरो टु हिरो

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP:https://play.google.com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks

**प्रकाशन : ३१ डिसेंबर २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.









भारतीय हिरो म्हटले की सर्वप्रथम अमिताभ बच्चन यांचे नाव घेतले जाते. गेली जवळपास पाच दशके अभिनयातून जगभर आधिपत्य गाजवणारे अमिताभ जगप्रसिद्ध आहेत. भारतातच नव्हे तर अनेक देशांनी त्यांच्या कर्तृत्वाची प्रशंसा त्यांना पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे....

अशा ह्या झिरो टू हिरो जर्नी ऑफ अमिताभ बच्चन ह्या पुस्तकामध्ये त्यांच्या यशोगाथेचा हा धावता आढावा






# Zero to Hero
# Journey of
# Amitabh Bachchan

# अमिताभ बच्चन
# असे
# घडले

# अर्पणपत्रिका



मी हे पुस्तक माझे पूर्वज
आईवडील, पत्नी
ह्यांना व चित्रपटसृष्टीतील
सर्वांनाच हे पुस्तक
अर्पण करतो

**यशराज**

# मनोगत

नमस्कार,

झिरो टू हिरो जर्नी ऑफ अमिताभ बच्चन हे पुस्तक वाचून अमिताभ बच्चन ह्यांची यशोगाथा वाचण्याच्या तुमच्या तळमळीचे अभिनंदन....

एक यशस्वी असणाऱ्या आणि आणखी मोठे यश संपादित करू इच्छिणाऱ्या व्यक्तीचे हे पुस्तक आपण वाचणार ह्यामध्ये तीळमात्रही शंका नाही......

अमिताभ बच्चन हे भारतीय चित्रपट सृष्टीमधील सर्वोच्च कामगिरी करणारे अभिनेता व्यक्तिमत्त्व आहे.....

भारतीय हिरो म्हटले की सर्वप्रथम अमिताभ यांचे नाव अजूनही घेतले जाते. गेली जवळपास पाच दशके अभिनयातून जगभर आधिपत्य गाजवणारे अमिताभ जगप्रसिद्ध आहेत... भारतातच नव्हे तर अनेक देशांनी त्यांच्या कर्तृत्वाची प्रशंसा करून त्यांना पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे....

अशा ह्या झिरो टू हिरो जर्नी ऑफ अमिताभ बच्चन ह्या पुस्तकामध्ये तुम्हाला अमिताभ बच्चन ह्यांचे वडील प्रा. डॉ. हरिवंशराय बच्चन तसेच अमिताभ ह्यांच्या जन्मापासून ते वयाच्या ७३ व्या वर्षांपर्यंतची त्यांची यशोगाथा टिपली आहे.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, आर. आर. पाटील ह्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकानंतर 'बाळासाहेब ठाकरे यशोगाथा' ह्या पुस्तकावर संपूर्ण महाराष्ट्राने खूप खूप प्रेम केले...

आजही मला जगभरातून अनेक मराठी युवक युवतींची पत्रे, इ मेल किंवा फोनद्वारे प्रतिसाद मिळत आहे... त्या पुस्तकात लिहिलेली व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक यशराज सूत्रे जीवन यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक ठरत आहेत.

खास करून 'बाळासाहेब ठाकरे यशोगाथा' पुस्तकाच्या एका धड्यात ('राजकारणातील बिग बी व सिनेसृष्टीतील बिग बी') बाळासाहेब ठाकरे व अमिताभ बच्चन यांच्या मैत्रीच्या नात्यासंबंधी लिहिले आहे. त्या निमित्ताने अमिताभ बच्चन यांच्याविषयी काही पुस्तके वाचली तसेच इंटरनेटवरून माहिती मिळवली आणि मी जाणले की डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, बाळासाहेब ठाकरे, धीरूभाई अंबानी यांच्याप्रमाणेच अमिताभ बच्चन हेदेखील झिरो टू हिरो आहेत...

अमिताभ बच्चन ह्यांच्याविषयी वेगवेगळ्या ठिकाणी प्रसिद्ध झालेले वाचण्यापूर्वी मला एवढेच माहिती होते की गांधी परिवाराबरोबर चांगले संबंध असल्याने अमिताभ बच्चन ह्यांना चित्रपटसृष्टीत संधी मिळाली वगैरे वगैरे....

पण अमिताभ बच्चन यांची माहिती मिळाल्यावर असे लक्षात आले की अमिताभ बच्चन हे पूर्णतः स्वकर्तृत्वावर आणि कुटुंबातील सदस्यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे सुपरस्टार झाले आहेत...

हे पुस्तक पूर्ण करीत असताना अचानक असे वाटले की सुपरस्टार अमिताभ बच्चन ह्यांची प्रेरणादायी यशोगाथा अगदी मोजक्या शब्दांत लिहावी आणि मग ठरवले ते ठरवलेच...

अमिताभ बच्चन ह्यांचा लहानपणापासूनची यशोगाथा सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत पोहोचेल... व अधिकाधिक लोकांना त्यांच्या स्वतःच्या जीवनातील ध्येयपूर्तीस हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल....

चित्रपट सृष्टीचे आकर्षण सर्वांनाच असते, त्याला मीदेखील अपवाद नाही. शालेय  महाविद्यालयीन जीवनात अनेकदा नाटक, पथनाट्य, डान्स ह्यामध्ये मी सहभाग घेतला होता. पुढे जाऊन

चित्रपट किंवा मालिका ह्यामध्ये काम करण्याची इच्छादेखील होती. त्यानुसार प्रयत्न केले, संधी मिळालीदेखील होती, परंतु अचानकपणे २००३ मध्ये माझा एक ॲक्सिडेंट झाल्यामुळे मला तिकडे वेळच देता आला नाही.

नंतर आर्थिक ध्येयपूर्तीस अधिक महत्त्व दिल्याने कोणत्याही ऑडिशनला जाता आले नाही...

चित्रपट व मालिकेत काम करण्याचे माझे स्वप्न मी साकार करणारच आहे..

मला पूर्ण खात्री आहे की अगदी मोजक्या शब्दांत लिहिलेले हे छोटे पुस्तक तुम्हाला तुमच्या जीवनाला एक नवी दिशा देण्यासाठी नक्कीच फलदायी ठरेल...

पुस्तक वाचताना ते पूर्ण वाचा आणि त्यानंतर तुमच्या जीवनातील कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी तुमचे ध्येय लिहून काढा. ते सतत तुम्हाला दिसेल, ऐकायला मिळेल अशा स्वरूपात जिवंत ठेवा. नियोजनबद्धता व कृती ह्यांच्याद्वारे ते नक्कीच पूर्ण होईल, त्यासाठी अमिताभ बच्चन ह्यांची यशोगाथा तुम्हाला नक्कीच प्रेरणा देईल...

खूप खूप शुभेच्छा

खूप खूप धन्यवाद, आभार, थँक्स.

आपला,

**यशराज पारखी**

# अनुक्रमणिका

एक नवमतवादी श्रीवास्तव कुटुंब
श्रीवास्तव झाले बच्चन
अमिताभ बच्चनचे बचपन
तेजी हरिवंशराय बच्चन
शिक्षणाकडून करिअरकडे
नोकरीकडून चित्रपटाकडे
मन लागेना नोकरीत
घेतली उडी चित्रपट सृष्टीत आवेश
अन् चित्रपटात प्रवेश
सकारात्मकवृत्तीचा राजा इखऋइ
अखिर यमराज हार गया!
कारण अन् राजकारण
डॉन को पकडना....
अइउङ चे जहाज बुडाले
कौन बनेगा करोडपती
आदरार्थी अन् पुरस्कारार्थी
झिरो २ हिरो जर्नी

# एक नवमतवादी श्रीवास्तव कुटुंब

मा. श्री. पद्मश्री, पद्मभूषण डॉ. अमिताभ बच्चन हे भारतीय सिनेमासृष्टीतील सर्वोच्च स्थानावर असलेले, सुपरस्टार व भारतातील करोडोकरोडो लोक त्यांचे चाहते आहेत. भारतात सर्वोत्कृष्ट कलाकारांमध्ये त्यांना सन्मानाचे स्थान आहे. गेली चारपाच  दशके भारतीयच नव्हे तर संपूर्ण जगातील करोडो लोक त्यांचे फॅन आहेत. सिनेमासृष्टीमध्ये प्रवेश केल्यापासून काही कालावधी वगळता त्यांच्या चाहत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच राहिली आणि अजूनही वाढताना दिसते. त्यांच्या कर्तृत्वाची प्रशंसा १९८४ मध्ये पद्मश्री, २००१ मध्ये पद्मभूषण, फ्रान्समधील सर्वाधिक महत्त्वाचा नाईट ऑफ दी रिजन ऑफ ऑनर हा नागरी सन्मान पुरस्कार त्यांना देण्यात आला. तसेच जगातील सर्वोत्कृष्ट सहा विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेटने सन्मानित केले. राष्ट्रीय पातळीवर त्यांना शेकडो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध देशांमध्ये त्यांना २७ पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

अमिताभ बच्चन हे भारतीय सिनेमासृष्टीतील एक दैवी शक्ती असलेले परमोच्च स्थान मानले जाते. भारतात एकूण २९ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या भाषेचा प्रभाव आहे. भारतात २२ अति महत्त्वाच्या भाषा आहेत, त्यानुसार प्रत्येक राज्यात त्या त्या भाषेतील एक वेगळी सिनेमासृष्टी आहे. अधिकाधिक लोक मातृभाषेतील सिनेमा अधिक पाहतात कारण त्या त्या भाषेतील चित्रपट पाहणे लोकांना अधिक जवळचे वाटतात. दक्षिण भारतात तर सिनेमासृष्टीतील हिरोंना

दैवी मानसन्मान मिळतो. अमिताभ बच्चन ह्यांचे अधिकाधिक सिनेमे हे हिंदीतील आहेत. अमिताभ बच्चन ह्यांच्यामुळे हिंदी सिनेमे सर्वश्रुत झाले, आणि सर्व भारतीयांनी स्वीकारले. अमिताभ बच्चन ह्यांचे चाहते सर्वच वयोगटांतील आहेत. लहान मुलामुलींपासून चिरतरुणांपर्यंत आणि तरुणांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांचेच अमिताभ बच्चन हे आवडते हिरो आहेत. खरे तर सिनेमासृष्टीत वयोमानानुसार भूमिका बदलल्या जातात, आणि तारुण्यातील व्यक्तीच हिरो म्हणून स्वीकारली जाते, परंतु अमिताभ बच्चन हे आजही त्यांच्या सिनेमातील हिरो म्हणूनच स्वीकारले जातात.

सध्या २०१५ मध्ये अमिताभ बच्चन ह्यांचे वय ७३ असले तरी ते त्याच उमेदीने अजूनही सिनेसृष्टीमध्ये कार्य करताना दिसतात. अमिताभ बच्चन ह्यांच्याविषयी जाणण्यापूर्वी त्यांच्या कुटुंबाविषयी व आईवडिलांवि षयी जाणणे अधिक महत्त्वाचे आहे.

(हरिवंशराय ह्यांच्या आईचे नाव सूरसती म्हणजे सरस्वती, तर वडिलांचे नाव प्रतापनारायण. हरिवंशराय हे सहावे पुत्र, सुरुवातीला मुलींच्या जन्मानंतरची दोन मुले अकाली मरण पावली म्हणून पंडित रामचरण शुक्लजी ह्यांनी सूरसती गर्भवती राहिल्यावर हरिवंशपुराण ऐकवे असे सांगितले. त्यानंतर मुलाचा जन्म झाला. त्याचे नाव हरिवंशराय असे ठेवण्यात आले, पण सर्वजण त्यास बच्चन असेच म्हणत.)

२७ नोव्हेंबर १९०७ मध्ये उत्तर प्रदेशात प्रतापगड जिल्ह्यातील बाबुपट्टी, राणीगंज गावात श्रीवास्तव कायस्थ कुटुंबात हरिवंशराय बच्चन ह्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांच्या कौटुंबिक प्रथेनुसार वडील प्रतापनारायण श्रीवास्तव व आई सरस्वतीदेवी ह्यांच्या मार्गदर्शनानुसार कायस्थ पाठशाळेमध्ये प्रवेश घेतला. कायस्थ पाठशाळेमध्ये उर्दूचे शिक्षण घेऊन कायदेतज्ज्ञ होण्याची पहिली पायरी म्हणून त्या काळी समजली जायची. त्यानंतर पुढील शिक्षण अलाहाबाद युनिव्हर्सिटी व बनारस हिंदू युनिव्हर्सिटीमध्ये घेतले.

तो काळ भारतात स्वातंत्र्यप्राप्तीच्या संघर्षाचा काळ होता. देशात गल्लोगल्ली महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ चालू होती. अशा चळवळीत हरिवंशरायसारखे विद्वान व्यक्तिमत्त्व सुरुवातीपासूनच सहभागी होते. उच्च विद्याविभूषित असलेल्या हरिवंशराय ह्यांना भारत

स्वतंत्र होणे किती गरजेचे आहे ह्यांची कल्पना होती, त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीमध्ये अत्यंत सक्रिय म्हणून त्यांचे नाव अग्रगण्य होते. भारत स्वतंत्र झाला, चळवळीबरोबरच इ. स. १९४१ ते १९५२ पर्यंत हरिवंशराय श्रीवास्तव ह्यांनी अलाहाबाद युनिव्हर्सिटीमध्ये इंग्रजी विभागात शिकवण्याचे कार्य केले. त्यानंतर प्राध्यापक म्हणून सेंट कॅथॅरीन कॉलेज, केम्ब्रिज येथील केम्ब्रिज विद्यापीठातून त्यांनी इंग्रजी लिटरेचरमध्ये डॉक्टरेट मिळवली. जवाहरलाल नेहरू हे केम्ब्रिज युनिव्हर्सिटीमधून इंग्रजी लिटरेचरमधून डॉक्टरेट मिळवणारे पहिले भारतीय, तर डॉ. हरिवंशराय हे दुसरे भारतीय होत.

डॉ. हरिवंशराय डॉक्टरेट नंतर प्राध्यापकाची नोकरी करत, ऑल इंडिया रेडिओ अलाहाबाद येथेसुद्धा कार्य केले. त्या काळात घरोघरी आजच्याप्रमाणे टीव्ही नव्हता. घरोघरी फक्त होता रेडिओ. त्यामुळे रेडिओवरील कार्यक्रमांना अनन्यसाधारण असे महत्त्व होते. ऑल इंडिया रेडिओमुळे हरिवंशराय फारच सुप्रसिद्ध झाले होते.

सुपरस्टार डॉ. पद्मश्री, पद्मभूषण अमिताभ हरिवंशराय बच्चन ह्यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४२ रोजी भारतातील उत्तर प्रदेश राज्याच्या अलाहाबादमध्ये कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हरिवंशराय श्रीवास्तव ऊर्फ बच्चन, तर आईचे नाव तेजी बच्चन. हरिवंशराय भारतातील सुप्रसिद्ध कवी म्हणून नावाजलेले नाव. डॉ. हरिवंशराय ह्यांच्या अनेक कविता जगभर गाजल्या आहेत. त्यांची कोशिश करनेवालो की हार नही होती ही प्रत्येक भाषणकर्त्या वक्त्याच्या तोंडावर नेहमी ऐकायला मिळते.

त्या काळात लग्न ही अगदी लहान वयातच व्हायची, त्याला श्रीवास्तव कुटुंबपण अपवाद नव्हते. त्यामुळे वयाच्या १९ व्या वर्षीच १४ वर्षीय श्यामा ह्यांचे लग्न हरिवंशराय ह्यांच्याबरोबर झाले. परंतु त्यांचा संसार फार काळ टिकू शकला नाही, लग्नाच्या अवघ्या १० वर्षांनंतर १९३६ मध्ये वयाच्या २४ व्या वर्षी श्यामा ह्यांचा दीर्घकाळ टीबीमुळे मृत्यू झाला. श्यामा ह्यांच्या जाण्यामुळे २९ वर्षीय हरिवंशराय कोसळले होते. खरे तर त्यांचा जीवनसाथीदारच हरवला होता. जिच्याबरोबर आयुष्यभर राहण्याचे स्वप्न पाहिले होते, ते स्वप्नच भंगले होते.

त्यांचे कशातच लक्ष लागत नव्हते. चार वर्षे तसेच चालले, मग घरातील मोठ्यांच्या आग्रहाखातर कालांतराने १९४१ मध्ये हरिवंशराय ह्यांनी पुन्हा लग्न केले, ते तेजी ह्यांच्याबरोबर. तेजी ह्या पंजाबी घराण्यातल्या होत्या. लग्न झाल्यानंतर हरिवंशराय ह्यांच्या जीवनाला एक टर्निंग पॉइन्टच मिळाला. तेजी ह्याचे आईवडिलांच्या घरचे आडनाव सुरी. रावळपिंडीतील कल्लूर येथील सरदार खजानसिंह सुरी यांची तेजी ही सर्वांत धाकटी कन्या. तेजी यांच्या वडिलांनी इंग्लंडला जाऊन बॅरिस्टरी केली व लायपूरमध्ये त्यांनी वकिली सुरू केली. त्यांची पतियाळा रियासतीत महसूलमंत्री म्हणून नियुक्ती झाली. कालांतराने ते लाहोरला स्थायिक झाले, तेव्हाच तेजी ह्या अवघ्या तीन महिन्यांच्या असताना, आई देवाघरी गेल्या. त्यानंतर सरदारांनीच आई आणि वडील अशा दोघांचीही जबाबदारी निभावली. उच्चशिक्षण घेऊन त्या लाहोरच्या खूबचंद डिग्री कॉलेजमध्ये सायकॉलॉजी विषय शिकवत होत्या. त्यांची हिंदी कवी म्हणून सुप्रसिद्ध असणाऱ्या हरिवंशराय ह्यांच्याशी भेट झाली, दोघांमध्ये प्रेमाचे सूर जुळले आणि त्यांचा विवाह झाला. हरिवंशराय एक सुप्रसिद्ध लेखक व कवी होते, तर तेजी ह्या एक उत्तम कलावंत, निर्भीड, स्वच्छंद, स्वतंत्र विचारसरणीच्या होत्या.

□

# श्रीवास्तव झाले बच्चन

म्हणतात ना लहान मूल पोटात असताना, त्यावर जशा प्रकारचे गर्भसंस्कार केले जातात, त्यानुसार आयुष्यभर त्याचा प्रभाव, त्या मुलांवर राहतो, हरिवंशराय पोटात असताना त्यांनी जे काही हरिवंशपुराण गर्भसंस्कारात ऐकले, त्याचाच प्रभाव पडल्याने हरिवंशराय उत्तम लेखक व कवी झाले.

लहानपणापासून बच्चन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिवंशराय ह्यांना वाचनाची फार आवड होती. विश्वविद्यालयात असताना, पहिल्या वर्षापासूनच हरिवंशराय ऊर्फ बच्चन हे कथा स्पर्धेत भाग घेत असत, पुढे जाऊन त्यांनी कथालेखनही सुरू केले. कथालेखनाबरोबर त्यांना कविता करायलादेखील आवडत असे. त्यांचे मुक्त विचार व भावना ते आपल्या कवितेत मुक्तछंदपणे मांडत असत. अशा कविता ते त्याच्या सुंदर हस्ताक्षरात वहीमध्ये लिहून ठेवत असत. एका मासिकामध्ये त्यांच्या निवडक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. हरिवंशराय हे त्यांच्या कविता व लेखन बच्चन ह्या नावानेच करत असत. पुढे जाऊन हरिवंशराय बच्चन ह्यांचा मधुशाला हा काव्यसंग्रह देशभर खूप गाजला. त्यामुळे हरिवंशराय ह्या हिंदी कवीचे नाव संपूर्ण भारतभर लोकांच्या तोंडी येऊ लागले. त्या वेळेस हरिवंशराय मधुशाला अलाहाबाद रेडिओ केंद्रात जाऊन काव्यसंग्रह सादर करीत होते. त्या वेळेस रेडिओ हे एकमेव प्रभावी साधन होते. मधुशाला काव्यसंग्रह रेडिओवर ऐकताना लोक डोलत असत, झुलत असत. मधुशाला काव्यसंग्रह १९३५ मध्ये प्रकाशित झाला. परंतु हा आनंद हरिवंशराय बच्चन ह्यांच्या

पत्नी श्यामा ह्या टीबीच्या आजारपणामुळे देवाघरी गेल्याने फार काळ टिकला नाही. हरिवंशराय पूर्णपणे एकटे पडले.

हरिवंशराय हे स्पृश्यअस्पृ श्य कदापि मानत नसत, त्यांचे विचार नवमतवादी होते. उच्च विद्याविभूषित असल्यामुळे त्यांना इतरांचे पुरातनवादी विचार कदापि पटत नसत. त्यामुळे ते त्यांचे विचार स्पष्टपणे सर्वांसमोर मांडत असत. त्यामुळे नातेवाइकांनी त्यांना वाळीत टाकले होते.

हरिवंशराय हे नवमतवादी असल्याने ते हरिजनांच्या घरी जाऊनही भोजन करत. एकदा तर हरिवंशराय ह्यांनी एका शीख कुटुंबाच्या घरी जाऊन भोजन केले, त्या शीख कुटुंबाने विधवेशी नाते जोडल्यामुळे शीख कुटुंबाला बहिष्कृत केले होते. ह्या घटनेने हरिवंशराय ह्यांच्यावर सर्व कुटुंबांतील व्यक्ती अत्यंत नाराज झाल्या आणि हरिवंशराय ह्यांनाही त्यांनी बहिष्कृत केले. कदाचित हेही एक कारण असावे की हरिवंशराय ह्यांनी श्रीवास्तव आडनावाऐवजी बच्चन हे नाव पुढे लावण्यास सुरुवात केली.

हरिवंशराय एम. ए. करत असतानाच, १९३० च्या सुमारास गांधीजींच्या दांडीयात्रेस सुरुवात झाली, इंग्रजांच्या मिठावर असलेल्या करप्रणालीविरुद्ध व हिंसेविरुद्ध अहिंसक मार्गाने सत्याग्रह करायचा असे महात्मा गांधी ह्यांचे म्हणणे होते.

त्या वेळेस हरिवंशराय अवघ्या २३ वर्षांचे होते, तारुण्यात देशभक्तीने त्यांचे अंग अंग स्फुरण पावत होते. हरिवंशराय ह्या दांडीयात्रेत सक्रिय सहभागी झाले. त्या मोर्चात जाऊन ते घोषणा देत असत. ठिकठिकाणी होणाऱ्या सभांना ते हजेरी लावत होते. आपले तरुणाईचे विचार काव्याच्या रूपाने लोकांसमोर मांडत होते. त्या काळात हरिवंशराय ह्यांनी काही देशभक्तिपर गाणीही लिहिली व सर्वांसमोर ती गायली. सर जाए तो जाए, पर हिंद आजादी पाए अशा प्रकारची लिहिलेली गाणी भारतभर गाजली.

# अमिताभ बच्चनचे बचपन

कविवर्य म्हणून भारतभर प्रसिद्ध असलेल्या हरिवंशराय बच्चन व तेजी बच्चन ह्यांचा संसार अधिकच फुलला तो लहान मुलाच्या जन्मानंतर. लहान मुलांचा जन्म झाल्यावर घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्या लहान मुलाचे नाव अमिताभ असे ठेवण्यात आले.

अमिताभ लहानपणी शाळेत असताना, त्याला आवडणारा रंगीबेरंगी खोडरबर आपल्याकडे असावा असे त्याला वाटले आणि अमिताभने शाळेतील एका मुलाच्या कंपासमधून तो खोडरबर चोरला. घरी गेल्यावर अमिताभने आज काही चुकीचे केले आहे असे आईच्या लक्षात आले, अभ्यास घेत असताना, अमिताभने खोडरबर चोरून आणल्याचे आईच्या लक्षात आले. त्यावर आईने अमिताभला वेताच्या छडीने झोडपून काढले. नेहमी अंगावरून प्रेमाने हात फिरवणाऱ्या आईने या वेळेस मात्र हयगय केली नाही, दयादेखील दाखवली नाही. अमिताभ खूप खूप रडला. त्याचे डोळे लालबुंद होऊन सुजले. तेव्हा दुसऱ्या दिवशी मी शाळेत अशा स्थितीत जाणार नाही, असे अमिताभने म्हटल्याबरोबर आईने त्याला दरडावून सांगितले, तुला शाळेत जावेच लागेल आणि जर तुझे डोळे लालबुंद का झाले असे शिक्षकांनी किंवा मित्रांनी विचारल्यास त्यांना सांग, की मी खोडरबर चोरला म्हणून आईने मला शिक्षा केली आणि मी आईला वचन दिले की येथून पुढे दुसऱ्याच्या कोणत्याही वस्तूला हात लावणार नाही.

अमिताभच्या आईने हट्टाने त्याला सेंट मेरीज कॉन्व्हेंटमध्ये दाखल केले, सुरुवातीला वडिलांचा त्याला विरोध होता, पण होममिनिस्टरपुढे वडिलांचे

काही चालले नाही.

एका बाजूला १९४२ च्या चलेजाव आंदोलनाची धार वाढत होती आणि भारत स्वतंत्र होण्याच्या दिशेने वाटचाल करीत होता, तर हिंदुस्थानापासून वेगळा पाकिस्तान निर्मितीचे स्वप्न मुस्लिम नेते पाहत होते. भारत स्वतंत्र झाला, पण पाकिस्तान वेगळा होऊन फाळणीपूर्वीच्या दंगलीत पंजाबमध्ये तेजी बच्चन ह्यांच्या नातेवाइकांची हत्या झाली. त्या काळात अनेक लोक बच्चन ह्यांच्या कुटुंबात आसऱ्याला होते. त्यातच महात्मा गांधींची हत्या झाली. त्या काळात हरिवंशराय ह्यांनी लिहिलेला कवितासंग्रह 'खादी के फूल' व 'पंतजी' नावाने प्रसिद्ध झाला.

अमिताभच्या आईला सौंदर्याची आणि स्वच्छतेची उत्तम जाण होती. आजवर इतिहासाने सिद्ध केलेले आहे की ज्या ज्या व्यक्तींना स्वच्छता आणि आंतरिक सौंदर्याची व बाह्य सौंदर्याची जाणीव असते, शिस्त हा ज्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो अशा व्यक्ती आणि त्यांची मुले खूप खूप मोठी झालेली दिसतात. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, बाळासाहेब ठाकरे अशी अनेक उदाहरणे आपणास त्याकरिता देता येऊ शकतात.

अमिताभ पुढे जाऊन मोठा होण्यामागचे सर्वांत मोठे कारण हेच आहे. आईकडून मिळालेल्या उत्तम संस्कारांमुळे, स्वच्छता, सौंदर्य ह्याच्या शिकवणीमुळे व शिस्तीच्या वातावरणामुळेच अमिताभ बच्चन सुपरस्टार होऊ शकले.

पुढील शिक्षणासाठी हरिवंशराय जेव्हा केम्ब्रिजला जाणार होते. म्हणतात ना शिक्षण घेण्याला कोणतेही वय नसते, त्यानुसार लग्नानंतर एक मुलगा झालेला असतानादेखील हरिवंशराय ह्यांनी पुढील शिक्षणाचे ध्येय अंगीकारले होते. तेव्हा अमिताभला हरिवंशराय (बाबा) म्हणाले, "अमिताभ, आता मी परत येईपर्यंत तूच ह्या घरातील मोठा पुरुष असशील, तेव्हा आई व भावाची नीट काळजी घे." त्यावर अमिताभ छाती पुढे करून व मान ताठ करून म्हणाला, "मी आता मोठा झालोय, काळजीचे कारण नाही, मी सर्व बघेन."

यानंतर शिक्षण पूर्ण करून हरिवंशराय परतले.

बच्चन कुटुंब काही वर्षे अलाहाबादमध्ये एडल्फीच्या ऐसपैस घरात

राहत होते. घरासमोर एक सुंदर गार्डन होते, हिरवळीवर झोपून अमिताभ चांदण्याचा मनसोक्त आनंद लुटत असे. त्यांच्या घरी, आजोबांनी अमिताभला विशेष भेट दिलेला ग्रामोफोन होता. हा फोन उंचावर ठेवलेला होता. हँडल फिरवून, चावी देऊन एकामागोमाग एक रेकॉर्ड लावून अमिताभ तासन्तास ती जुनी वाद्यसंगीतमय गाणी ऐकत बसायचा.

अमिताभ उंचीमुळे, त्याच्या लांब असलेल्या हातापायांमुळे त्याकडे एक विशेष खेळाडू म्हणून शाळेमध्ये पाहण्यात येत असे. अमिताभसुद्धा जिद्दीने वेगवेगळ्या ॲथलेटिक्समध्ये भाग घेत असे. बॉक्सिंगमध्ये अमिताभने अनेकदा भाग घेतला होता. बॅडमिंटन हा खेळ अमिताभला विशेष आवडत असे, कारण कदाचित अमिताभच्या उंचीला साजेसा असाच तो खेळ आहे. शिवाय इतर मुलांबरोबर गोट्या, विटीदांडू खेळण्यातही अमिताभ सहभागी असे. पतंग उडवणे अमिताभला आवडत असे.

अमिताभच्या अशा खेळाडूवृत्तीचा फायदा बक्षिसे मिळवण्यासाठी झालक्ष. अमिताभला शाळेत ॲथलेटिक्समध्ये पुष्कळ बक्षिसे मिळाली.

अमिताभच्या आई तेजी बच्चन ह्या सौंदर्यप्रिय व स्वच्छताप्रिय होत्या तर वडील शिस्तप्रिय होते. शिस्त म्हणजे दुसरेतिसरे काही नसून नियोजनबद्ध रीतीने, योग्य वेळी, योग्य ठिकाणी एखादी गोष्ट करणे किंवा ठेवणे किंवा वागणे होय. तीच शिकवण हरिवंशराय ह्यांनी अमिताभला व अजिताभला दिली होती. त्यानुसार अमिताभ व अजिताभची रूम नीटनेटकी असायची. पुस्तके व वह्या नीट रचून ठेवलेल्या असायच्या. अमिताभला वडिलांप्रमाणेच वाचनाची प्रचंड आवड होती. अनेकदा अमिताभ त्याच्या रूममध्ये एकटा पुस्तके वाचत बसायचा. वडिलांनी परदेशावरून अनेक छान छान पुस्तके वाचण्यासाठी आणली होती. अमिताभ पुस्तके आवर्जून वाचायचा, तसेच कधी कधी टेबलाचा तबला करून तो वाजवत गाणीदेखील गायचा.

# तेजी हरिवंशराय बच्चन

अमिताभच्या आईकडे अनेक सुप्त गुण दडले होते. त्यांना अभिनयाची प्रचंड आवड होती. त्यांच्यामध्ये अभिनयगुण आहे, ह्याची तेजी बच्चन यांच्या मित्रपरिवाराला कल्पना होती. त्या वेळी पुण्यामध्ये शालीमार व प्रभात असे प्रसिद्ध स्टुडिओ होते. शालीमार स्टुडिओमध्ये हरिवंशराय ह्यांना गीतकार तर अभिनेत्री म्हणून तेजी बच्चन ह्यांना संधी होती. परंतु तेजी बच्चन ह्यांनी आपल्या मुलांसाठी त्यांच्या वैयक्तिक करिअरचा त्याग केला. त्यामुळेच कुटुंबातील हरिवंशराय व अमिताभसारखे हिरे घडले. १८ मे १९४८ रोजी तेजी बच्चन यांना दुसऱ्या पुत्ररत्नाची प्राप्ती झाली. आवडीने त्याचे नाव अजित ठेवण्यात आले. अमिताभ व अजिताभ थोडे मोठे झाल्यावर शाळेत जाऊ लागले. मुले शाळेत गेल्यावर उगाचच घरी वेळ फुकट वाया घालवण्यापेक्षा तेजी बच्चन ह्या शाळेजवळच असलेले अन्नपूर्णा रेस्टॉरंट भाड्याने चालवत असत. मुलांना शाळेबरोबरच तेजी त्यांना आवर्जून पिक्चर दाखवण्यासाठीसुद्धा घेऊन जात असत. शाळेत असताना अमिताभला आईने पहिला चित्रपट दाखवला तो लॉरेल हार्डीचा 'फ्लाईंग ड्यूसेस.' त्या वेळेस लॉरेल हार्डीच्या विमान चालवण्याच्या करामती बघून अमिताभ पोट धरून हसत होता. हिंदी चित्रपटांमधील अमिताभला पहिला चित्रपट दाखवण्यात आला होता, तो म्हणजे इन्सानियत. त्यामध्ये चिंपांझीच्या लीला असल्यामुळेच चित्रपट पाहण्याची परवानगी देण्यात आली होती. त्या चित्रपटात दिलीपकुमार व देव आनंद प्रमुख भूमिकेत होते. कोणती गोष्ट करायची, कोणती नाही ह्यावर आईची विशेष नजर होती.

# शिक्षणाकडून करिअरकडे

□

सेंट मेरीज स्कूलमध्ये असताना वार्षिक स्नेहसंमेलनात अमिताभने एका परिकथेवरील नाटकात भाग घेतला होता, त्या वेळेस त्याचे भरभरून कौतुक झाले होते. त्यानंतर प्रत्येक वर्षी अमिताभ वार्षिक स्नेहसंमेलनात नाटकांमध्ये मोठ्या हिरीरीने भाग घेत असे. अलाहाबादेत काही वर्षे राहिल्यानंतर बच्चन कुटुंब दिल्लीला आले. बच्चन कुटुंब आणि नेहरू गांधी कुटुंब यांचे अगदी जवळचे संबंध होते. दिल्लीत आल्यावर अमिताभसुद्धा नेहरू परिवाराबरोबर अधिक जवळ आला. पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या मुलीचे नाव इंदिरा. लग्नानंतर इंदिराचे नाव इंदिरा गांधी असे झाले. इंदिरा गांधी ह्यांना दोन मुले झाली. एकाचे नाव संजय तर दुसऱ्याचे नाव राजीव. अनेकदा गांधी कुटुंब अन् बच्चन कुटुंबातील व्यक्ती एकत्र झाल्यानंतर ही लहान मुले एकमेकांबरोबर मनसोक्त खेळत असत.

अमिताभचा जेव्हा चौथा वाढदिवस साजरा होत होता, तेव्हा दोन अडीच वर्षांचा असलेला राजीवसुद्धा त्याठिकाणी आला होता. त्या वाढदिवसात फॅन्सी ड्रेस पार्टी होती, त्यामध्ये सुरुवातीला राजीवने धोब्याचा पेहराव केला होता व नंतर पांढरीशुभ्र सलवार व कुर्ता घालून एका काँग्रेसी नेत्याचाही पेहराव केला होता. त्याला अक्षरश: सर्वांनी टाळ्यांनी दाद दिली होती. राजीव व संजय गांधी ह्यांचे घर खेळण्याने पूर्ण भरले होते. राजीवला विमानाबरोबर खेळण्यास फार आवडत होते. पुढे जाऊन राजीव वैमानिक बनतील असे स्पष्ट दिसत होते. शाळेच्या सुट्टीत अमिताभ व अजिताभ आवर्जून गांधी कुटुंबाकडे जात असत, तर कधी कधी राजीव व संजय

बच्चन कुटुंबाकडे येत असत.

दिल्लीत अमिताभ फार दिवस राहू शकले नाहीत. कारण आईवडिलांनी अमिताभला नैनितालच्या शेरवूड रेसिडेन्शिअल बोर्डिंग स्कूलमध्ये पुढील शिक्षणासाठी पाठवण्याचे ठरवले. बोर्डिंग स्कूलला पाठवण्यासाठी स्टेशनवर सोडायला आईवडीलसु द्धा गेले होते. अमिताभने त्या वेळेस आईवडिलांपासून दूर जाण्याचे दु:ख आवरले. छोट्या भावाला मात्र अश्रू आवरले नाहीत. अजिताभने अमिताभला घट्ट मिठी मारली. आई मात्र मनातल्या मनात रडत होती, परंतु बाहेरून आनंदाने अमिताभला प्रेरणा देत होती.

शेरवूडमध्ये अगदी शिस्तबद्ध वातावरणात नियमावलीत अमिताभने शिक्षण घेतले (त्यामुळेच की काय, अमिताभ बच्चनने पुढे जाऊन सुपरस्टार झाल्यानंतरही बोर्डिंग स्कूलवरील गोष्टीवर आधारित चित्रपटात अप्रतिम अभिनयाने करोडो करोडो प्रेक्षकांची मने जिंकली.) शेरवूडमध्ये असताना अमिताभच्या अभिनय कौशल्याला आणखी चांगली संधी मिळाली, एका नाटकामध्ये अप्रतिम अभिनय कौशल्याबद्दल अमिताभला पारितोषिकसुद्धा मिळाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर अमिताभ पुन्हा घरी परतले.

अमिताभ व अजिताभ तीन मूर्ती भवनामध्ये गेल्यावर संजय व राजीवसोबत रेडिओग्रामवर रेकॉर्ड्स् लावून ऐकत असत. एकदा रेकॉर्ड्स् ऐकत असताना रेडिओचा आवाज इतका वाढला की तो राजीव संज यचे आजोबा पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्यापर्यंत पोहचला होता. त्यामुळे खुद्द नेहरूजी येऊन त्यांना रागावले होते, पण त्या रागातही प्रेम होते. पंडितजींना लहान मुले फार आवडत असत, त्यामुळेच आजही त्यांच्या १४ नोव्हेंबर ह्या जयंतीनिमित्त आपण संपूर्ण देशभर बालदिन साजरा करतो.

पंडितजी कितीही कामात व्यग्र असले तरी आवर्जून ते लहान मुलांबरोबर गप्पा मारण्यासाठी त्यांच्या खोलीत जात असत. त्या वेळेस त्या ठिकाणी काही वेळा संजय व राजीवसोबत अमिताभ व अजिताभदेखील असायचे. अमिताभला खेळण्यामध्ये किल्लीची खेळणी खूप आवडत असत. कधी कधी ही सर्व लहान मुले त्यांच्या आईबरोबर सहलीलादेखील जात असत, त्यामध्ये संजय, राजीव, अमिताभ, अजिताभ, तेजी बच्चन व इंदिरा गांधी ह्यांचा समावेश असायचा. पुढे जाऊन शेवटपर्यंत ही मैत्री घट्ट राहिली.

अमिताभ दिल्लीतील कॉलेजमध्ये शिकत असताना, राजीव गांधी परदेशात शिकत होते. तेव्हा राजीव आवर्जून पत्रे पाठवत असत, त्या पत्रांमध्ये परदेशामध्ये कसे राहणीमान आहे, खर्चाचे प्रमाण कसे आहे, तेथील आणि भारतातील चलनामध्ये काय फरक आहे, तेथे कशी महागाई आहे, ह्या सर्वांविषयी ते सविस्तर लिहीत असत. येथे एवढा खर्च आहे की मला टेपरेकॉर्डरसुद्धा घेणे शक्य नाही, असेही राजीव गांधींनी लिहिले होते. ह्यावरून असे लक्षात येते की, राजा असो की प्रजा, श्रीमंत असो की गरीब सर्वांनाच पैशाची चणचण भासते.

राजीव परदेशातून भारतात येताना काही ना काही भेटवस्तू घेऊन येत असे. एकदा तर राजीवने विदेशावरून आवडीने जिवलग मित्र अमिताभसाठी जीन्स पँटदेखील आणली होती. पुढे जाऊन लहानपणी राजीवने पाहिलेले स्वप्न खरे झाले. राजीव गांधी वैमानिक बनले. राजीव केम्ब्रिजमध्ये असताना, अमिताभबरोबर पत्रव्यवहारातून संपर्कात होते. त्यांची मैत्री इतकी घट्ट होती की ते त्यांच्या वैयक्तिक गोष्टीसुद्धा एकमेकांना आवर्जून सांगत. राजीव व सोनिया यांच्या केंब्रिजमध्ये जुळलेल्या प्रेमसंबंधाविषयी अमिताभला राजीव आवर्जून सांगत. पहिल्यांदा जेव्हा सोनिया भारतात आल्या तेव्हा अमिताभ ह्यांच्याकडेच राहिल्या होत्या. तेथेच लग्नाची ठरवाठरवी झाली, मेहंदीचा कार्यक्रम झाला. असे अगदी शेवटपर्यंत इंदूमावशी (इंदिरा गांधी) व राजीव गांधी असेपर्यंत कधीही बच्चन कुटुंबाने साथ सोडली नाही.

सुरुवातीला अमिताभला सैन्यातील लोकांचा थाटमाट पाहून सैन्यात जावे असे आकर्षण होते. त्यानुसार आईवडिलांनी अमिताभला पुण्यातील खडकवासला येथे आर्मी ट्रेनिंगसाठी पाठवण्याचा निर्धारसुद्धा केला होता. परंतु अमिताभकडे असलेल्या अभिनय कौशल्यामुळे व खेळाडू वृत्तीमुळे तो अधिक चांगला कलाकार किंवा खेळाडू होऊ शकेल असे दिसू लागले. अमिताभला सैन्यातील मंडळींचा अभिमान वाटत होता, परंतु लष्करी शिक्षणात फारसा रस नव्हता.

अमिताभचा त्या वेळेस बी. एस्सी. होऊन इंजिनीअर होण्याचा विचार होता. सीनिअर केम्ब्रिजमध्ये अमिताभला सेकंड क्लास मिळाला, त्यामुळे बी. एस्सी.साठी ॲडमिशन कोणत्या कॉलेजमध्ये मिळेल का नाही, अशी

अडचण निर्माण झाली होती. परंतु हरिवंशराय बच्चन ह्यांच्यामुळे दिल्लीतील किरोरीमल कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली. अमिताभ बी. एस्सी. झाला. परंतु त्याला त्यापुढील शिक्षणात फारसा रस राहिला नाही. इंजिनीअर बनणे हे करिअर आपल्यासाठी नव्हे हे त्याच्या लक्षात आले. अमिताभला अभिनयामध्ये रस होता, परंतु त्यामध्ये कितपत यश मिळेल ह्याची खात्री तेव्हा नव्हती. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यावर अमिताभला कोलकत्त्याच्या बर्ड ॲण्ड ब्लॅकर्स कंपनीत १९६३ मध्ये नोकरी मिळाली. व

यवस्थापकाची जबाबदारी म्हणून लठ्ठ पगाराची ती नोकरी होती. जाण्या येण्यासाठी कंपनीच्या वतीने चारचाकी गाडी, राहण्यासाठी उत्तम घर, नोकरचाकर अशा सर्व सुविधा त्या नोकरीने त्याला दिल्या होत्या. सुरुवातीला अमिताभला ते हवेहवेसे वाटले. अधूनमधून होत असलेल्या पार्ट्यासुद्धा मनोरंजक वाटत राहिल्या, परंतु ही नोकरी आयुष्यभर करणे म्हणजे पाट्या टाकण्याचे जीवन जगणे होय, अशी अमिताभला जाणीव झाली. मला अशा प्रकारची नोकरी करणे आयुष्यभर जमणार नाही, शिवाय ह्यामुळे आपल्यातील कलागुणांना वाव मिळणार नाही, म्हणून त्याने पुन्हा दिल्लीला परतण्याचे ठरवले. त्या वेळी अमिताभचे वय २४/२५ वर्षांचे होते.

कोलकत्त्याला असताना, अमिताभला मानेचे दुखणे उद्भवले. सर्व तपासण्या केल्यानंतर तो एक प्रकारचा ट्यूमरच आहे असे लक्षात आले. ऑपरेशन करण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही, तसेच ह्या ऑपरेशनमुळे संपूर्ण शरीरावरसुद्धा परिणाम होऊ शकतो, असेही डॉक्टरांनी स्पष्टपणे सांगितले. देवावर विश्वास ठेवून आईवडिलांनी ऑपरेशन करण्याचे ठरवले. ऑपरेशन यशस्वी झाले, त्याचा परिणाम काही नसांना बसला. शरीरावरही थोडा परिणाम झाला, परंतु त्या आजारातून अमिताभ वाचला. ह्या ऑपरेशनसाठी दिल्लीला परतलेल्या अमिताभने पुन्हा कोलकत्त्याला जायचे नाही असे स्वत: त्याने व कुटुंबीयांनी ठरवले.

कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना अमिताभने शेक्सपिअरच्या काही नाटकांत कामे केली. पुढे जाऊन रंगभूमीवर छोटी मोठी कामे अमिताभ करीत राहिले. त्या काळात ऑल इंडिया रेडिओ हे लोकांपर्यंत पोहोचण्याचे सर्वांत प्रभावी साधन होते. आज जसे हजारो चॅनेल्स आपणास पाहण्यास

मिळतात, पूर्वी तशी स्थिती नव्हती. रेडिओ हे एकमेव असे साधन होते. जे गावोगावी पोहोचलेले होते. पूर्वी अनेकदा डॉ. हरिवंशराय ऑल इंडिया रेडिओवर आपली कलाकारी व कविता प्रदर्शित करण्यासाठी जात असत.

पुण्यामध्ये ऑल इंडिया रेडिओमध्ये वृत्तनिवेदक पाहिजे अशी जाहिरात आली होती. डॉ. प्रा. हरिवंशराय बच्चन ह्यांच्या मार्गदर्शनानुसार अमिताभने वृत्तनिवेदक होण्यासाठी अर्ज केला होता, त्या इंटरव्ह्यूकरिता त्याला पुण्याला बोलावणे आले होते. त्याच्या घोगऱ्या व भारदस्त आवाजामुळे अमिताभला आवाजाच्या चाचणीमध्ये नापास करण्यात आले होते. त्यामुळे अमिताभ सुरुवातीला कमालीचा निराश झाला, परंतु वडिलांची 'कोशीश करनेवाले की कभी हार नही होती' ही कविता त्याला आठवली.

भगवान बुद्धाने म्हटले आहे

हर हरकत मूल मे कारण सच्चा देख।<br>
बिन कारण संसार मे पत्ता हिले ना एक।।

# नोकरीकडून चित्रपटाकडे

□

भारतातील सर्वांत महत्त्वपूर्ण अशा नेहरू गांधी कुटुंबाचे निकटवर्तीय सुप्रसिद्ध कविवर्य डॉ. प्रा. हरिवंशराय बच्चन व तेजी बच्चन ह्यांचा सुपुत्र म्हणून अमिताभला ओळखले जात होते. कोलकत्त्यामध्ये नोकरीला कंटाळलेल्या व मानेच्या आजारातून सावरणाऱ्या अमिताभला सुरुवातीच्या काळात योग्य मार्गदर्शन व पाठिंबा लाभला. डॉ. हरिवंशराय बच्चन हे सरकारी सेवेतून निवृत्त झाले आणि त्यांच्या कलागुणांमुळे, अभ्यासू वृत्तीमुळे त्यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली.

एकदा डॉ. प्रा. खासदार हरिवंशराय बच्चन रशियाला गेले होते, तेव्हा त्यांनी अजिताभच्या सांगण्यावरून कॅमेरा आणला होता. अजिताभ हा अत्यंत व्यवहारी होता. ध्येयप्राप्तीचे नियोजन करून ते प्राप्त करण्यासाठी कृतींची आखणी करण्यात तो पटाईत होता. त्याने अमिताभची आवड ओळखली होती, पण स्थैर्य नसलेल्या ह्या सिनेसृष्टीत स्थैर्य मिळवण्यासाठी नियोजनबद्ध कृती अजिताभकडून आखण्यात आली. त्यानुसार अमिताभ याची वेगवेगळ्या पेहरावींमधील व भावना प्रदर्शित करतानाची अनेक छायाचित्रे त्या कॅमेऱ्यात टिपण्यात आली. ते फोटो घेऊन मुंबईला जाऊन निर्मात्यांच्या भेटीगाठी घ्यायच्या व त्या वेळी अमितचे हे फोटोही द्यायचे असे ठरवण्यात आले.

त्यानुसार पहिल्यांदाच फोटोसहित युनायटेड प्रोड्यूसर्स फिल्म फेअरमध्ये अर्ज करण्यात आला, परंतु त्यामध्ये प्राथमिक फेरीसाठीसुद्धा

बोलावणे आले नाही. त्यानंतर अनेक स्टुडिओमध्ये चकरा मारण्यात आल्या, परंतु काहीही फायदा झाला नाही. कालांतराने कोलकत्त्याच्या एका कंपनीत काम करणाऱ्या अजिताभची बदली १९६८ मध्ये मुंबईला झाली. त्या वेळेस अमिताभसाठी संधी शोधत असताना 'सात हिंदुस्थानी' नावाच्या चित्रपटासाठी नवीन कलावंताच्या शोधात ख्वाजा अहमद अब्बास हे निर्माते आहेत असे अजिताभला कळले. चित्रपटसृष्टीत अब्बास ह्यांचे मोठे नाव होते. एक कम्युनिस्ट पत्रकार, आर. के. फिल्म्सचे लेखक व ध्येयवादी निर्माते, दिग्दर्शक म्हणून त्यांची ओळख होती. चित्रपटसृष्टीत त्यांचे नाव आदराने घेतले जात होते. निर्माते, दिग्दर्शक अब्बास ह्यांच्याकडे अमिताभचे फोटो अजिताभने परस्पर पाठवले. अब्बास ह्यांना ते आवडले व त्यांनी अमिताभला ताबडतोब बोलावले. अमिताभने ताबडतोब नोकरीचा राजीनामा दिला व ते मुंबईला आले.

त्या वेळेस अमिताभ १६०० रुपये पगाराची नोकरी सोडून १५ फेब्रुवारी १९६९ रोजी अब्बास ह्यांना भेटण्यासाठी मुंबईला आला. अब्बास साहेबांनी सर्व कलाकारांना सिनेमाची कथा ऐकवली, त्यामध्ये अमिताभसाठी ठरवलेली व्यक्तिरेखादेखील अमिताभला आवडली. उंचीने, आवाजाने असे प्रभावी व्यक्तिमत्त्व सर्वांनाच आवडले. अमिताभचे मानधन पाच हजार रुपये ठरवण्यात आले. अमिताभ बच्चन हे प्रा. डॉ. हरिवंशराय बच्चन ह्या सुप्रसिद्ध कवीचे सुपुत्र आहे असे निर्माते दिग्दर्शक अब्बास ह्यांना काही दिवसांनंतर कळले. कदाचित अमिताभ घरातून पळून मुंबईला आला आहे आणि म्हणूनच की काय अमिताभने हरिवंशराय ह्या एवढ्या मोठ्या व्यक्तीचे नाव घेणे टाळले असा समज अब्बास ह्यांचा झाला. नंतर सर्व गोष्टी स्पष्ट झाल्यानंतर, कोणत्याही शिफारशीविना स्वत:च्या कलाकारीवर स्थान मिळवू पाहणाऱ्या अमिताभचा स्वाभिमान अब्बास ह्यांना भावला.

सात हिंदुस्थानी हा चित्रपट गोवा मुक्तीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा, देशप्रेमावर आधारित होता. अमिताभ बच्चन त्या चित्रपटामध्ये एका मुस्लिम युवकाची भूमिका करत होता, त्यामध्ये त्या मुस्लिम युवकाचे नाव अन्वर असे होते. त्या चित्रपटात काम करणारे दोन अन्वर होते, एक अमिताभ बच्चन व दुसरा मेहमूदचा भाऊ ज्याचे खरेखुरे जीवनातील नावही अन्वर होते.

चित्रपटामध्ये पोर्तुगीज लोक एका हेराला रेल्वेगाडीतून फेकून देतात, तेव्हा ते चित्रपटातील अन्वरला अन्यायाचे वाटते, तो त्याला विरोध करतो, रेल्वेची साखळी तो खेचण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा उत्पल दत्त त्याला समजावतो. त्यावर एक शेर अन्वर ऊर्फ अमिताभ म्हणतो 'आँधी आए या तूफाँ, कोई गम नही.'

देहबोली व भाषा ह्यांवरील प्रभुत्वामुळे एक देशभक्त म्हणून सात हिंदुस्थानीमध्ये काम करणाऱ्यांमध्ये अमिताभ बच्चनचा प्रभाव दिसला. हा चित्रपट व्यावसायिकदृष्ट्या असफल ठरला असला तरी अमिताभसाठी मात्र तो सफल ठरला, त्यामुळे अमिताभला सुनील दत्तने त्यांच्या अजंठा आर्टस्मध्ये काम करण्याची संधी दिली. ह्यापूर्वी सुनील दत्त बरोबर काम करण्यासाठी अमिताभ बच्चन ह्यांनी स्वप्न पाहिलेले प्रत्यक्षात उतरले. यापूर्वी अनेकदा अजंठा आर्ट्स् स्टुडिओमध्ये अमिताभ काम मागण्यासाठी गेला होता.

सुनील दत्त त्या वेळी 'रेश्मा और शेरा' या चित्रपटाची निर्मिती करीत होते. त्यामध्ये एक भूमिका अमिताभला देण्यात आली. सुरुवातीला काही डायलॉग देण्यात आले होते, परंतु नंतर ती भूमिका एका मुक्याची असेल असे ठरले. अमिताभला सुरुवातीला ते कमीपणाचे वाटले, परंतु सकारात्मक ॲटिट्यूड असलेल्या अमिताभ बच्चनने 'त्यामुळे मला मुक्याचा अभिनय करण्याची उत्तम संधी मिळाली' असा दृष्टिकोन निर्माण केला आणि खरोखरच त्यामुळे अमिताभला अशी अनोखी भूमिका करण्याची संधी मिळाली.

खरे तर तेजी बच्चन व नर्गिस दत्त ह्यांचे जवळचे मैत्रीचे संबंध होते. सुरुवातीला अमिताभने त्यांच्याकडे जाण्याचे टाळले. मराठीत म्हण आहे स्वत:चे कर्तृत्व सिद्ध केल्याशिवाय कोणालाही कुत्रेसुद्धा विचारणार नाही. अमिताभने शिफारशीवर काम न मिळवता, कर्तृत्वावर काम मिळवण्याचे ठरवले.

नंतर अमिताभने मोहन सहगल ह्यांच्याकडे स्क्रीन टेस्टसाठी रूपतारा स्टुडिओमध्ये गेला. त्या वेळी आशा पारेख व मनोजकुमार ह्यांच्या साजन चित्रपटाचे शूटिंग चालू होते. अमिताभने स्क्रीन टेस्ट दिल्यानंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वाविषयी अत्यंत अनुद्गार काढले गेले. त्याचे दिसणे, शारीरिक

ठेवण याविषयी टीका केली गेली. परंतु त्यांच्या या निंदेमुळे अमिताभ बच्चन कदापि खचला नाही.

तुकाराम महाराजांनी म्हटले आहे...

चंदनाचे वासे धरतील नाक
नावडे कणिक न घडे हे।।
साखरेची गोडी आवडे सकळ
थोरामोठ्या बाळा धाकुटिया।।
तुका म्हणे माझे चित्त शुद्ध होते
तरी का निंदती जन मज।।

तर खुद्द तुकाराम महाराजांपासून सर्वांनाच चांगले काम करणाऱ्या व्यक्तीलासुद्धा निंदानालस्तीला सा मोरे जावे लागते. तरी तुकाराम महाराज कधीही खचले नाहीत. तुकाराम महाराजांनाही निंदानालस्तीला सामोरे जावे लागले. ह्याबाबत अमिताभलाही माहीत होते, निंदानालस्तीला बळी पडता कामा नये, त्यानुसार तो कदापि खचला नाही.

काही छोट्या छोट्या भूमिका केल्यावर प्रमुख नायकांच्या भूमिकेत काम करण्याची अमिताभची इच्छा होती. त्या काळात मनोजकुमारसारखा हिरो अत्यंत प्रसिद्ध होता.

एकदा अमिताभ सन अँड सँड हॉटेलमध्ये पहचान चित्रपटाचे शूटिंग पाहण्यासाठी गेला होता. खरे तर मनोजकुमार ह्यांची स्टाईल, अदागिरी पूर्ण वेगळी होती. त्या पहचान चित्रपटात मनोजकुमार कॅमेऱ्यासमोर अगदी चित्रविचित्र अशा हरकती करत होते. अशा चित्रविचित्र हरकतीमुळेच चित्रपट प्रसिद्ध होतो आणि आपल्याला हे जमणार नाही, त्यामुळे आपण सरळ बॅग उचलावी आणि चालू पडावे असा विचार अमिताभ बच्चन याच्या मनात निर्माण झाला. परंतु सकारात्मक वृत्तीच्या अमिताभने त्या न्यूनगंडावर आत्मविश्वासाने मात केली.

# मन लागेना नोकरीत

स्वत:चा आत्मविश्वास वाढवायचा असेल, तर त्या क्षेत्रातील यशस्वी आणि आपल्याला समजून घेणाऱ्या व्यक्तीची भेट नक्की घ्यावी. अमिताभने त्याच्या दुसऱ्या दिवशी अगदी सहज कोणतेही उद्दिष्ट्य न ठरवता निर्माते दिग्दर्शक अब्बास ह्यांना भेटला. त्यादिवशी अब्बासजी हृषीकेश मुखर्जी ह्यांच्याकडे जाणार होते. अब्बासजींनी अमिताभच्या आतली तळमळ ओळखली व आपल्याबरोबर हृषीकेश मुखर्जी ह्यांची भेट घेण्यासाठी घेऊन गेले.

त्या वेळेस हृषीकेश मुखर्जी 'आनंद' या चित्रपटाची निर्मिती करण्याच्या विचारात होते. तो चित्रपट सुपरस्टार राजेश खन्ना ह्यांस केंद्रस्थानी ठेवून निर्माण करण्याचे ठरवले होते. त्या चित्रपटातील बाबू मोशाय या भूमिकेसाठी धीरगंभीर आवाजाचा व प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा अमिताभ भूमिका उत्तम करेल असे हृषीकेश मुखर्जी ह्यांना वाटले आणि त्यांनी उत्तम कुमारऐवजी अमिताभ बच्चनचे नाव 'बाबू मोशाय' या भूमिकेसाठी फायनल केले.

या चित्रपटात बाबू मोशायचा एक डायलॉग आहे,

''आनंद, मै तुम्हे मरने नहीं दूंगा, आनंद तूम मर नही सकते...''

ह्या चित्रपटाने संपूर्ण भारत देशालाच नव्हे तर संपूर्ण जगालाच हळवे केले. या चित्रपटातील आनंद आणि बाबू मोशॉय संपूर्ण भारतीयांचे सुपरहिट आवडते कलाकार झाले. ह्यानंतर मात्र प्रा. डॉ. खासदार, कवी हरिवंशराय बच्चन हे अमिताभ बच्चन ह्यांचे वडील अशी ओळख निर्माण झाली.

'आनंद' नंतर अमिताभ यांनी 'प्यार की कहानी', 'परवाना', 'बॉम्बे टू गोवा' असे अनेक चित्रपट केले. अमिताभ आत्ता फिल्मी हिरो बनू लागल्याची ही लक्षणे दिसत होती. चित्रपटामध्ये किशोरकुमारांचे वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वगायन अमिताभच्या आक्रमकतेस योग्यच वाटत होते.

अमिताभ यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यापूर्वी, अस्थैर्य असलेल्या अशा करिअरमध्ये आपण पदार्पण करीत आहोत, त्यामुळे किमान आपल्याकडे तीनचार व र्षे पुरतील एवढ्या पैशांची तरतूद असली पाहिजे या उद्देशाने तेवढी बचत करून ठेवली होती. आईवडिलांचा पा ठिंबासुद्धा होता. त्यामुळे 'जो भी कर बिनधास्त कर' अशी भूमिका अमिताभ बच्चन यांची होती.

आत्ता अमिताभ यांची चित्रपटामध्ये मुख्य नायिकेच्या भूमिकेत काम करण्याची तयारी होती. नियोजनबद्ध कृती आखण्यात आली. वडिलांनी दुसऱ्यांदा पुन्हा रशियांवरून महागडा कॅमेरा विकत आणला होता. आशियाई लेखकांच्या संमेलनास डॉ. हरिवंशराय बैरूतला गेले. तेथून ते रशियात गेले. लिखाणातून मिळणाऱ्या रॉयल्टीच्या पैशांतून त्यांनी हा महागडा कॅमेरा विकत घेतला होता. त्या कॅमेऱ्यातून अमिताभ यांचे आणखी सुंदर फोटोग्राफ्स घेण्यात आले, ते सर्व निर्मात्यांना पाठवण्यात आले. नायक पदासाठी योग्य आहेस असा विश्वास अजिताभ व वडिलांनी अमिताभ यांच्यात निर्माण केला.

सुरुवातीस नायक म्हणून 'बन्सी बिरजू' व 'एक नजर', 'संजोग' अशा चित्रपटांत नायक म्हणून काम केले, पण ते यशस्वी झाले नाहीत. त्यानंतर पुन्हा अमिताभने 'रास्ते का पत्थर', 'गहरी चाल', 'बंधे हात' असे चित्रपट केले, पण तेदेखील पडले.

खरे तर तेव्हा अमिताभ यशाच्या मागे पळत होते. पूर्वीप्रमाणे असलेली सर्व बचत व कमाई त्याने मुंबईमध्ये घरासाठी खर्च केली होती. शिवाय आईची तब्येत ठीक नव्हती. वडील राज्यसभेच्या खासदारपदावरूनही निवृत्त झाले होते. दिवस अत्यंत जिकिरीचे होते.

आपले कोठेतरी चुकत असावे म्हणून एकामागून एक आपले चित्रपट अयशस्वी होत असावेत. सुरुवातीला अमिताभ फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हनुसार चित्रपटांची निवड करत गेले. त्या वेळेस त्या चित्रपटाची गोष्ट काय आहे,

चित्रपटाचे लेखन कोण करते आहे, निर्मातेि दग्दर्शक कोण आहेत, आपली भूमिका काय आहे, चित्रपटाचे डायलॉग कोण लिहीत आहे ह्यांचाही विचार करायला हवा असे अजिताभ आणि वडिलांनी अमिताभ यांना सांगितले.

परंतु त्या कालावधीत इतर नायक म्हणून स्वीकारलेल्या भूमिकेतून निर्माते, दिग्दर्शकांनी काढून टाकले. आजवर नायक म्हणून अमिताभ यांची भूमिका अयशस्वी ठरली होती. परंतु सकारात्मक वृत्ती असलेल्या अमिताभ यांनी अपयशाचे खरे कारण आपण व आपला अभिनय हे नसून त्या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद व इतर गोष्टी होत्या हे माहीत होते. त्यामुळेच खचून न जाता, जराही निराश न होता, 'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे' असे समजून ते पुढे चालत राहिले.

# घेतली उडी चित्रपटसृष्टीत

जया तरुणकुमार भादुरी ह्यांचा जन्म ९ एप्रिल १९४८ रोजी जबलपूरमध्ये हिंदू बंगाली कुटुंबात झाला. त्यांच्या आई इंदिरा भादुरी तर वडील तरुणकुमार भादुरी. लेखक, पत्रकार आणि स्टेज कलाकार म्हणून प्रसिद्ध होते. जया ह्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल भोपाळमध्ये झाले. अगदी सुरुवातीपासून नेतृत्वगुण असलेल्या जया ह्या खुल्या मनाच्या आणि बिनधास्त होत्या. आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे शाळेमध्ये त्या मुलींमध्ये प्रमुख सेक्रेटरी म्हणून होत्या. जशा त्या दिलखुलास तसेच शिस्तप्रियसुद्धा होत्या. लहानपणी शाळेत असताना त्या एन. सी. सी.मध्ये सहभागी होत्या. पंतप्रधानांच्या हस्ते १९६६ मध्ये त्यांना 'बेस्ट ऑल इंडिया एनसीसी कॅडेट' म्हणून सन्मानदेखील मिळाला.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण करताना जया यांनी वयाच्या अवघ्या १२ १३ वर्षीच सत्यजित रे ह्यांच्या महानगर चित्रपटात तसेच इतर दोन बंगाली चित्रपटांतदेखील काम केले होते. त्यामुळे आपले पुढचे करिअर हे चित्रपटसृष्टीतच आहे हे त्यांनी जाणले होते. घरच्यांचीदेखील पहिल्यापासून साथ होतीच. लहानपणी जया ह्यांनी जवळजवळ पाचसहा व र्षे नृत्याचे धडे घेतले होते. शाळेमध्ये अनेक नाटकांमध्ये जया सहभागी होत असत. दिलीपकुमार हे जयाचे सर्वांत आवडते हिरो. घरामध्ये आईवडिलांना रंगभूमीची आवड असल्यामुळे करिअरचा मार्ग स्पष्टपणे ठरलेला होता.

दहावीनंतर जयाने स्वत: अभिनय शिकण्यासाठी एखादी शिक्षणसंस्था आहे का असे बाबांना विचारले. १९६८ मध्ये त्यांनी पुण्याच्या फिल्म

इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला, गोल्डमेडल मिळवून त्यांनी तो कोर्स पूर्ण केला, कोर्स पूर्ण झाल्यावर फिल्म इन्स्टिट्यूटचे तत्कालीन संचालक जगतमुरारी ह्यांनी ह्षीकेश मुखर्जी ह्यांना जया भादुरी ह्यांचे नाव चित्रपटासाठी सुचविले. 'गुड्डी' चित्रपटात काम करण्याची संधी जया ह्यांना मिळाली, तेव्हा जया भादुरी व अमिताभ बच्चन ह्यांची भेट झाली.

अमिताभ बच्चन यांच्या 'सात हिंदुस्थानी' चित्रपटाचे शूटिंग पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटच्या कॅम्पसमध्ये झाले होते. तेव्हा अमिताभ पहिल्यांदा जया भादुरी ह्यांना भेटले होते. 'आनंद' चित्रपटामुळे अमिताभ बच्चन यांचे नाव देशभरात गाजले होते. 'गुड्डी' चित्रपटाच्या सेटवर अमिताभ बच्चन व जया भादुरी ह्यांच्या प्रेमाचे सूर जुळले. प्रेमाचे रूपांतर लग्नाच्या बेडीत झाले.

प्रेम म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून, 'आपली व्यक्ती जशी आहे तशी व जशी नाही तशी स्वीकारणे' होय. अमिताभ आणि जयामध्ये तसेच प्रेम होते. लग्नानंतर आयुष्य बदलते, दोनाचे चार हात होतात, काहींना दोनांचे चार झाल्याने जबाबदारी वाटते, काहींना ते कालांतराने ओझे वाटायला लागते, पण साथीदार योग्य मिळाला की आयुष्याला एक कलाटणी मिळते. ध्येय निश्चित होते. एकमेकांच्या चर्चेमुळे नियोजनबद्ध कृती होते.

जया भादुरी ह्यांच्या नावाला एक वलय होते. एक स्टार म्हणून त्या नावारूपाला आल्या होत्या. अमिताभसुद्धा स्टार होण्याच्या मार्गावर होते. अमिताभ व जया ह्यांचा ३ जून १९७३ रोजी विवाह झाला. विवाहास देशातील सर्व सन्माननीय मंडळी आली होती. चित्रपटसृष्टी, राजकारणी, समाजकारणामधील सर्वच मंडळी त्या लग्नसोहळ्यासाठी हजर होते.

लग्नानंतर अमिताभची 'जंजिर' चित्रपटात एक नायक म्हणून जोरदार एन्ट्री झाली. जंजिरमुळे अमिताभची 'अँग्री यंग मॅन' म्हणून प्रतिमा निर्माण झाली. जंजिर चित्रपट जगभर गाजला, सुपरहिट झाला. कालांतराने अमिताभ यांनी 'नमक हराम' हा चित्रपट केला. तोही उत्तम झाला.

अमिताभ आणि जया बच्चन ह्यांचे ज्या वर्षी लग्न झाले त्याच वर्षी त्या दोघांच्या भूमिका असलेला 'अभिमान' चित्रपट प्रदर्शित झाला. जंजिर आणि अभिमान चित्रपट सुप्रसिद्ध झाले.

अमिताभ यांना १९७१ च्या 'आनंद' चित्रपटातील भूमिकेसाठी 'बेस्ट

सपोर्टिंग ॲक्टर' म्हणून पुरस्कार मिळाला. त्यानंतर १९७१ मध्येच अमिताभ यांनी एक नकारात्मक भूमिकेचा 'परवाना' चित्रपट केला. त्यानंतर 'रेश्मा और शेरा' चित्रपट आला. 'नमक हराम'मध्ये अमिताभ यांना पुन्हा दुसऱ्यांदा फिल्मफेअरचे 'बेस्ट सपोर्टिंग ॲक्टिंग ॲवॉर्ड' मिळाले. १९७४ मध्ये अमिताभ यांनी, कुँवारा बाप, दोस्त, रोटी कपडा और मकान, मजबूर, झिकझॅग ह्या हॉलिवूडमधील चित्रपटांचे रिमेक करण्यात आले, त्यात भूमिका केल्या.

१९७५ मध्ये चुपके चुपके, फरार, मिली चित्रपटांबरोबरच यश चोप्रा यांच्या दीवार चित्रपटातही काम केले. त्यासाठी अमिताभ यांना बेस्ट ॲक्टर ॲवॉर्डसाठी नॉमिनेशन केले गेले. त्याच वर्षी १५ ऑगस्ट १९७५ रोजी 'शोले' चित्रपट प्रदर्शित झाला. शोले चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्व रेकॉर्ड मोडीत काढत, २३६ कोटी, ४५ लाखांचे उत्पन्न गाठले.

१९७६ मध्ये यश चोप्रा यांनी 'कभी कभी' हा रोमँटिक चित्रपट काढला. ह्या चित्रपटातील कामाबद्दल अमिताभ यांचे नाव पुन्हा फिल्मफेअर बेस्ट ॲक्टर ॲवॉर्डसाठी निवडण्यात आले. त्या वर्षी अमिताभ यांचा 'अदालत' चित्रपटदेखील प्रदर्शित झाला, त्यामध्ये अमिताभ यांनी वडील आणि मुलगा अशा दोघांचीही भूमिका केली.

१९७७ मध्ये अमिताभ यांनी 'फर्स्ट फिल्मफेअर बेस्ट ॲक्टर ॲवॉर्ड' मिळवले. ते ॲवॉर्ड 'अमर अकबर ॲन्थनी' चित्रपटासाठी मिळाले. त्या वर्षी अमिताभ यांचे परवरिश, खून पसिना हेही चित्रपट गाजले.

१९७८ मध्ये अमिताभ यांचे कस्मे वादे, डॉन हे चित्रपट आले. त्यांपैकी डॉन चित्रपट प्रचंड गाजला. त्यासाठी अमिताभ यांना दुसऱ्यांदा फिल्मफेअरचे 'बेस्ट ॲक्टर ऑफ दि इयर' ॲवॉर्ड मिळाले. त्या वर्षी अमिताभ यांनी यश चोप्रा यांच्या त्रिशूल व प्रकाश मेहरा यांच्या मुकद्दर का सिकंदरमध्ये काम केले.

# 'आखिर यमराज हार गया!'

१९७९ मध्ये अमिताभ बच्चन ह्यांच्या सुहाग चित्रपटाने त्या वर्षी सर्वाधिक कमाई केली. त्याच वर्षी मि. नटवरलाल, काला पत्थर, दी ग्रेट गॅम्बलर हे चित्रपट आले आणि गाजले. १९७९ मध्ये अमिताभ यांनी स्वत: मि. नटवरलालमध्ये गाणे गायले. १९८० मध्ये दोस्ताना चित्रपट प्रचंड गाजला. शान १९८१ मध्ये, तसेच सिलसिला चित्रपटात अमिताभ यांनी जया बच्चन ह्यांच्या बरोबर काम केले. नसीब, लावारिस चित्रपट यशस्वी झाले. १९८२ मध्ये अमिताभ यांनी सत्ते पे सत्ता, देशप्रेमी, बेमिसाल, महान असे चित्रपट केले. त्यापैकी सत्ते पे सत्तामध्ये डबल रोल तर महानमध्ये ट्रिपल रोल केला.

१९८२ मध्ये मनमोहन देसाईंच्या कुली चित्रपटाचे शूटिंग चालू होते. अमिताभ बच्चन यांची त्यामध्ये प्रमुख भूमिका होती. त्या चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान एका ॲक्सिडेंटमध्ये अमिताभ गंभीर जखमी झाले होते. ही बातमी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचली. त्या वेळेस तातडीने शिवसेनेची ॲब्युलन्स आली. अमिताभजींना ब्रीच कँडी रुग्णालयात अतिदक्षता विभागात ॲडमिट केले. खरे तर ती अमिताभजींच्या जीवनमरणाचीच झुंज होती .

त्या वेळेस बाळासाहेबांनी आणि ठाकरे परिवारातील सर्वांनीच विशेष देखभाल केली. पुण्यामध्ये जन्मलेल्या बाळासाहेबांना दगडूशेठ गणपतीचा महिमा माहीत होता. श्रीमंत दगडूशेठ गणपती हा नवसाला पावणारा गणपती आहे. त्यामुळेच बाळासाहेबांच्या सांगण्यावरून जया बच्चन यांनी

पुण्यातील दगडूशेठ गणपतीकडे धाव घेतली. जया बच्चन यांनी नवस केला आणि या नवसाला दगडूशेठ गणपती पावला. अमिताभ बच्चन मरणाच्या दारातून परत आले. ठरल्याप्रमाणे जया बच्चन यांनी सोन्याचे काम श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला नवसफेड म्हणून दिले.

हॉस्पिटलमध्ये अमिताभ बच्चन यांना भेटायला बाळासाहेब ठाकरे आवर्जून गेले होते. त्या वेळेस त्यांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या होत्या. त्या हॉस्पिटलमधील भेटीदरम्यान बाळसाहेबांनी एक अनोख्या स्वरूपाचे व्यंगचित्र अमिताभ बच्चन यांना भेट दिले. 'आखिर यमराज हार गया!' असे नाव असलेले ते व्यंगचित्र होते. त्या व्यंगचित्रातून बाळासाहेबांचे बच्चन कुटुंबावरील प्रेम, जिव्हाळा, आपुलकीची भावना व्यक्त होत होती.

अमिताभ यांचा कुली हा चित्रपट १९८३ मध्ये प्रदर्शित झाला आणि सुपरहिट ठरला.

# कारण अन् राजकारण

ह्या चित्रपटानंतर अमिताभ बच्चन यांनी १९८४ मध्ये अभिनयाच्या क्षेत्राला रामराम ठोकत राजकारणात दमदार एन्ट्री केली. बालपणापासूनचे अमिताभचे मित्र राजीव गांधी ह्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यरत होती, तेव्हा अमिताभ यांनी आठवी लोकसभा निवडणूक अलाहाबादमधून लढवली आणि मोठ्या फरकाने ते जिंकले. त्या वेळचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बहुगुणा ह्यांचा दारूण पराभव करत अगदी फिल्मी स्टाईलमध्ये अमिताभ बच्चन ह्यांची हिरो सारखीच राजकारणातदेखील एंट्री झाली. परंतु बोफर्स घोटाळ्यामध्ये त्यांना अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि तीन वर्षांतच त्यांनी राजीनामा दिला. कालांतराने त्यांना निर्दोष घोषित करण्यात आले.

अमिताभ बच्चन ह्यांनी आठवी लोकसभा निवडणूक लढवली तेव्हा प्रचार मोहिमेची सूत्रे व्ही. पी. सिंह ह्यांनी सांभाळली होती. थोड्याच दिवसांत राजीव गांधी व व्ही. पी. सिंह ह्यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यांनी बोफोर्स तोफा आणि पाणबुडी प्रकरणावरून आरोप केले. अमिताभ यांचे नावही त्यात मुद्दामहून घातले.

राजीव गांधी आणि बच्चन कुटुंब यांच्यावर बोफोर्स घोटाळ्यात आरोप झाले. पत्रकार आणि मीडिया चॅनेलवर सगळीकडे त्यांच्या बातम्या झाल्या. त्या काळात राजकारणात नवीन असलेल्या अमिताभ बच्चन यांना ते प्रकरण सहन होणार नव्हते. शिवाय काही बेशरम आणि गेंड्याची कातडी असणाऱ्या राजकारणी नेत्यासारखा त्यांचा स्वभाव नव्हता. अमिताभ

बच्चन यांच्यावर फार मोठे डोंगररूपी संकटच कोसळले होते. आरोपांच्या चक्रात अमिताभजी अगदी पिसले गेले. कोणीही त्यांच्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. परंतु त्या कसोटीच्या क्षणी बाळासाहेबांनी अमिताभ बच्चन यांची पूर्ण बाजू समजून घेतली. त्यांना मानसिक आधार दिला. 'मला खरं काय ते सांग. जर तुझी बाजू खरी असेल, सत्याची असेल तर मी बाळासाहेब ठाकरे तुझ्या पाठीशी आहे' असे बाळासाहेबांनी अमिताभ बच्चन यांना सांगितले. बाळासाहेबांनी दिलेल्या मानसिक आधारामुळे अमिताभ बच्चन यांचा आत्मविश्वास वाढला. बाळासाहेबांच्या पाठिंब्यामुळे व सांगण्यानुसार अमिताभजी अगदी धाडसाने प्रसारमा ध्यमांना भेटले, त्यांची बाजू सांगितली. आपली भूमिका सत्याची आहे हे पटवून देण्यासाठी अमिताभजींना कोर्टकचे ऱ्यादेखील कराव्या लागल्या.

कालांतराने, अमिताभ बच्चन ह्यांचे नाव मुद्दामहून जाणीवपूर्वक ह्यामध्ये घुसडले गेले हे कोर्टाच्या लक्षात आले. त्यामुळे अमिताभ बच्चन ह्यांची त्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्यात आली.

परंतु अखेरीस अमिताभ बच्चन यांची सत्याची भूमिका जिंकली. ह्या सगळ्या कसोटीच्या क्षणी बाळासाहेबांनी अगदी मोठ्या भावाप्रमाणेच त्यांना साथ दिली. बाळासाहेबांच्या सांगण्यानुसार अमिताभ बच्चन यांनी राजकारणातून पूर्णपणे काढता पाय घेतला.

# एबीसीएल जहाज बुडाले

राजकारणातील विटंबनेला कंटाळून अमिताभ बच्चन ह्यांनी पुन्हा चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले, ते शहेनशहा चित्रपटाच्या प्रमुख नायकाच्या भूमिकेत. शहेनशहा यशानंतर लागलीच १९८९ मध्ये अमिताभचे जादूगर, तुफान, मै आजाद हूँ असे चित्रपट आले आणि आदळले. अमिताभचा हम हा चित्रपट १९९१ मधील सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. त्याकरिता अमिताभ यांना तिसरे बेस्ट फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाले.

त्यानंतर १९९० मध्ये अमिताभचा अग्निपथ हा चित्रपट चांगलाच हिट झाला. १९९२ मध्ये अमिताभ यांचा खुदा गवाँह हा चित्रपट गाजला. त्यानंतर इन्सानियत चित्रपट आला पण तो फारसा चालला नाही. कालांतराने अमिताभ यांनी चित्रपटसृष्टीतून निवृत्ती घेण्याचे ठरवत काही लोकांच्या सल्ल्याने अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड (ABCL) १९९६ मध्ये कंपनीची स्थापना केली. खरे तर अमिताभ बच्चनच्या नावे कंपनी स्थापन करण्यासाठी जया बच्चन यांचा विरोध होता. परंतु त्यांनी तो विरोध घराबाहेर येऊ दिला नाही.

ABCL कंपनीचे ध्येय हे १० बिलियन म्हणजे भारतीय एन्टरटेनमेन्ट मधील १००० कोटी रुपयांची उलाढाल २००० सालापर्यंत पूर्ण करण्याचे होते. एबीसीएल कंपनीने करमणुकीच्या क्षेत्रातील सर्व क्षेत्रांत गुंतवणूक करून सर्व प्रकारच्या सेवा व प्रॉडक्ट निर्मितीचे ध्येय ठरवले होते. त्यामध्ये व्यावसायिक फायद्याच्या दृष्टीने, चित्रपटांची निर्मिती करणे, त्या चित्रपटांचे भारतात सर्व ठिकाणी वितरण करणे, थिएटरच्या माध्यमातून

ते जनमानसांपर्यंत पोहोचवणे, त्या चित्रपटांची कमी खर्चात अगदी सुलभ साधनांच्याद्वारे जाहिरात करणे, तसेच चित्रपटातील गाण्यांची ऑडिओ सीडी बनवणे व विक्री करून फायदा कमवणे, हे कंपनीचे ध्येय होते.

विविध गाण्यांच्या अल्बमची सीडी प्रकाशित करून विक्री करणे व फायदा कमवणे. चित्रपटाच्या व्हिडिओ कॅसेट्स् बनवून त्या विकणे, व्हिडिओ डिस्क बनवणे व विकणे, विविध टेलिव्हिजनसाठी लागणारे सॉफ्टवेअर्स बनवणे, विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व विविध सेलेब्रिटी कलाकारांना बोलावून तो यशस्वी करणे व फायदा कमविणे. अशा बहुउद्देशीय कंपनीची स्थापना उच्च पदस्थ मॅनेजमेंटच्या माध्यमातून चालू करण्यात आली.

एबीसीएल कंपनीने सुरुवातीला अर्षद वारसी व सिमरन ह्या नवीन कलाकाराला संधी देत, तेरे मेरे सपने हा चित्रपट काढला, हा चित्रपट फारसा चालला नाही. त्यानंतर आणखी काही चित्रपटांची निर्मिती केली, परंतु दुर्दैवाने कोणताही चित्रपट चालला नाही. १९९६ मध्ये एबीसीएल कंपनीने कोटी कोटी रुपये खर्च करून जागतिक मिस सुंदरी स्पर्धा बेंगलोरसाठी स्पॉन्सरशिप दिली. परंतु त्याचा दुष्परिणाम एबीसीएलच्या मॅनेजमेंटवर झाला. एबीसीएलचा आर्थिक डोलारा कोसळला.

एबीसीएलच्या मॅनेजमेंटवर कार्यक्रमाला अनुसरून काही आरोप, प्रत्यारोप झाले. त्याच कालावधीत एबीसीएल कंपनीच्या वतीने अमिताभचा मृत्युदाता हा चित्रपट आला. परंतु तोही चित्रपट फारसा करिश्मा दाखवू शकला नाही. आर्थिक डोलारा कोसळल्यामुळे अमिताभ बच्चन ह्यांना त्यांचा बंगला व इतर प्रॉपर्टीसुद्धा गहाण ठेवाव्या लागल्या. जे होते ते सगळे गेले, होत्याचे नव्हते झाले. अमिताभने व जयाजींनी स्वकष्टाने उभारलेला यशाचा डोंगर पूर्ण कोसळला आणि डोंगराच्या ठिकाणी फार मोठ्या खड्ड्याचे भगदाड पडले. एवढा मोठा आर्थिक खड्डा भरून निघूच शकत नाही. आता सगळे संपले असे सर्वांना वाटू लागले.

जया बच्चन ह्यांनी योग्य जीवन साथीदाराची भूमिका निभावली. अमिताभ बच्चन ह्यांना पुन्हा उभे केले. आपल्याकडे काहीही नसताना जर हे विश्व आपण एकदा उभारू शकतो, तर दुसऱ्यांदासुद्धा उभारू शकतो. खरे तर अमिताभ व जया ह्यांची सकारात्मक वृत्तीच कामाला आली.

# सकारात्मक वृत्तींचा राजा बिग बी

अमिताभ यांनी वयाच्या ५५ व्या वर्षी पुन्हा अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केले. १९९८ मध्ये बडे मिया छोटे मियाँ असा चित्रपट केला. तो चित्रपट यशस्वी झाला, परंतु १९९९ मध्ये प्रदर्शित झालेले सूर्यवंशम, लाल बादशहा, हिंदुस्थान की कसम हे चित्रपट मात्र फारसे करिश्मे दाखवू शकले नाहीत. काय करावे कळत नव्हते. कर्जरूपी पाणी अगदी मानेपर्यंत पोहोचले होते, हे असेच चालत राहिले, तर लवकरच हे कर्जरूपी पाणी आपणास आपल्या नाकाता ेंडात जाऊन, आपणास बुडवून टाकील अशी स्थिती निर्माण झाली होती. मार्ग काहीच दिसत नव्हते, फक्त लक्षात होती ती वडील हरिवंशराय ह्यांची कविता ...

कोशिश करने वाँलो की हार नही होती
लहरों से डरकर नौका पार नहीं होती
हिम्मत करने वालों की हार नहीं होती।

नन्ही चींटी जब दाना लेकर चलती है,
चढ़ती दीवारों पर सौ बार फिसलती है,
मन का विश्वास रगों में साहस भरता है,
चढ़कर गिरना, गिरकर चढ़ना न अखरता है,
आखिर उसकी मेहनत बेकार नहीं होती,
कोशिश करने वालों की हार नहीं होती।

डुबकियां सिंधु में गोताखोर लगाता है,
जाजाकर   खाली हाथ लौट आता है,
मिलते न सहेज के मोती पानी में,
बहता दूगना उत्साह इसी हैरानी में,
मुट्ठी उसकी खाली हर बार नहीं होती,
हिम्मत करने वालों की हार नहीं होती।

असफलता एक चुनौती है स्वीकार करो,
जब तक न सफल हो नींद चैन को त्यागो तुम,
संघर्षों का मैदान छोड़ मत भागो तुम,
कुछ किये बिना ही जयज  यकार नहीं होती,
हिम्मत करने वालों की हार नहीं होती।

प्रा. डॉ. हरिवंशराय बच्चन

शेवटी परमेश्वर तुम्हाला जेवढे मोठे संकट देतो, तेवढीच मोठी आंतरिक शक्ती तो तुम्हाला देत असतो. तुम्ही फक्त तुमच्या आंतरिक शक्तीला जागवणे गरजेचे असते. खुद्द अमिताभ बच्चनसुद्धा असाच काही करिश्मा होण्याच्या शोधात होते. अभिनयामध्ये त्यांचा हातखंडा होता. सुपरस्टार बिग बी म्हणून ते सुप्रसिद्ध होतेच. शिवाय अगदी सहजतेने घडलेला शोले आणि त्याला मिळालेले यश हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नव्हते. अगदी शोले चित्रपट काढणाऱ्या निर्मार्ते दग्दर्शक ह्यांनी त्यानंतर कितीतरी अधिक प्रयत्न शोलेसारखा चित्रपट काढण्यासाठी केला, परंतु तशा धर्तीचा चित्रपट पुन्हा घडला नाही. तशाच प्रकारच्या यशाच्या शोधात अमिताभ बच्चन होते.

कोणत्याही व्यक्तीचे यशापयश हे त्या व्यक्तींच्या मनाच्या प्रोग्रॅमिंगवर अवलंबून असते. हे प्रोग्रॅमिंग समजावून सांगण्यासाठी मी आपणास एक उदाहरण देतो.

असे गृहीत धरा की तुम्ही एका एसी रूममध्ये बसलेले आहात. त्या रूमच्या खिडक्या आणि दरवाजे हे पूर्णत: बंद आहेत. त्या एसीमध्ये

(थर्मोस्टॅट) तापमान २५°C ला सेट करण्यात आले होते.

न क्कीच २५°C होय ना. बरोबर.

आता तुमच्या जीवनाशी संबंधित दोन घटना पाहूयात.

घटना १ रूमच्या बाहेर अत्यंत उष्णता आहे. बाहेरचे तापमान हे ४२°C आहे, अशा स्थितीत ह्या रूमच्या सर्व खिडक्या व दरवाजे उघडण्यात आले तर आतमधील रूमचे तापमान वाढेल की कमी होईल?

तुमचे उत्तर असेल ते नक्कीच वाढेल, कारण बाहेरची गरम हवा आतमध्ये येईल. त्यामुळे जरी एसी २५°C असले तरी बाहेरच्या ४२°C तापमानामुळे व दारे खिडक्या उघडल्यामुळे रूमचे तापमानही वाढेल.

अगदी बरोबर आणि हो पुन्हा दारे खिडक्या बंद केल्यावर एसीमुळे पुन्हा तापमान २५°C होईल.

घटना २ रूमच्या बाहेर तापमान हे फक्त १०°C आहे, अशा स्थितीत जर रूमचे सर्व दरवाजे व सर्व खिडक्या उघडल्यास रूममधील तापमान हे वाढेल का कमी होईल?

तुमचे उत्तर नक्कीच कमी होईल असे असेल, कारण बाहेरची थंड हवा रूममध्ये आल्यामुळे रूममधील एसीचा परिणाम कमी होईल आणि नक्कीच रूमचे तापमान २५°C पेक्षा नक्कीच कमी होईल.

आणि पुन्हा सर्व दरवाजे व खिडक्या बंद केल्यास पुन्हा रूमचे तापमान हे २५°C असे होईल.

आपल्या सर्वांच्या जीवनात आपल्या प्रत्येकाचे लहानपणापासून प्रोग्रॅमिंग झाले आहे. त्या प्रोग्रॅमिंगनुसार प्रत्येकाचा थर्मोस्टॅट हा काही लेव्हलला फिक्स झाला आहे. काही जणांचे हे प्रोग्रॅमिंग काही घटनांमुळे व स्थितीमुळे वाढतेसुद्धा आहे.

त्यानुसार काही लोकांचे प्रोग्रॅमिंग हे वार्षिक ६०,००० रुपयांना सेट झाले आहे, तर काहींचा १,००,०००, काहींचे १० लाख, काहींचे १ कोटी, काहींचे १० कोटी, काहींचे १००० कोटी, तर काहींचे काहीच नाही. आपण अनेकदा अनुभवले असेल की प्रत्येक व्यक्ती हुशार असूनही ती तिथल्यातिथेच असतो. आपल्याला दिसते की ती व्यक्ती त्याच्या हुशारीने मोठी होऊ शकते, पण होत नाही, तर काही व्यक्तींकडे जास्त शिक्षण आणि हुशारी नसतानादेखील खूप मोठे झालेले दिसतात. काय कारण असावे?

आपल्या सर्वांचे प्रोग्रॅमिंग हे तीन प्रकारे होते.

१) लहानपणापासून आपण ज्या वातावरणात राहतो, ज्या लोकांची संगत धरतो त्यानुसार ज्या व्यक्तीने प्रत्यक्षात ऐकलेल्या गोष्टींमुळे प्रोग्रॅमिंग होते. (ऐकीव)

२) लहानपणापासून आपण ज्या ज्या गोष्टी प्रत्यक्षात पाहतो त्यानुसार आपले प्रोग्रॅमिंग घडत जाते. (देखीव)

३) लहानपणापासून आपण ज्या ज्या गोष्टी प्रत्यक्षात अनुभवतो त्यानुसार आपल्या अनुभवातून आपले प्रोग्रॅमिंग घडत जाते. (आनुभविक)

ऐकीव, देखीव व आनुभविक रूपाने आपले प्रोग्रॅमिंग होते व आपला आर्थिक किंवा कोणताही थर्मोस्टॅट घडतो.

लहानपणापासून अमिताभ बच्चन हे उच्चभ्रू लोकांमध्ये राहिले; त्यांच्याविषयी त्यांनी ऐकले, प्रत्यक्ष पाहिले, तसेच काही अनुभवांतून पायरीपा यरीने त्यांचा आर्थिक थर्मोस्टॅटचा दर्जा वाढत गेला आणि त्यानुसार त्याच्या प्रोग्रॅमिंगनुसार त्यांचा आर्थिक दर्जा वाढला. परंतु कदाचित आपण काही कृती केली नाही, तर आपला आर्थिक दर्जा खालावू शकतो, ह्या भीतीमुळे त्यांच्या जीवनात काही चुकीच्या कृती घडल्या आणि त्यांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागले. परंतु एकदा का प्रोग्रॅमिंगचा थर्मोस्टॅट सेट झाला आणि त्यामध्ये आवश्यक त्या TEA च्या म्हणजेच विचार Thought Emotion Action भावना आणि कृती ह्या तिन्हींचा संगम होऊन मनुष्य कार्यरत राहतो. त्या व्यक्तीचा थर्मोस्टॅट पुन्हा पूर्ववत लेव्हलला सेट होतो आणि योग्य त्या पुनश्च कृतीमुळे तो थर्मोस्टॅट (आर्थिक) वाढतोदेखील.

असेच काही अमिताभ बच्चन ह्यांच्यासोबत घडले. भीतीतून बाहेर येऊन, स्थिर मनाने, लक्ष केंद्रित करून अमिताभ बच्चन ह्यांनी जेव्हा कृतीला सुरुवात केली, तेव्हा त्यांना योग्य संधी चालून आली.

□

# कौन बनेगा करोडपती

तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, ‘‘मुंगिचींया घरा कोण जाय मूळ देखनिया गुळ घाव घाली।’’

अर्थात गुळाची ढेप मुंगीच्या घरी कधीही जात नाही, परंतु जेव्हा जेव्हा मुंग्यांना संधी मिळते तेव्हा तेव्हा त्या गुळावर घाव घालतात.

तसेच अमिताभ बच्चन ह्यांच्याकडे जेव्हा छोट्या पडद्यावर कौन बनेगा करोडपती सारखा प्रोग्रॅम संधी म्हणून चालून आला तेव्हा त्यांनी त्या संधीचे सोने केले आणि अल्पावधीत तो कार्यक्रम भारतीयांचा सर्वांत आवडता कार्यक्रम झाला.

हा कार्यक्रम ब्रिटिश टेलिव्हिजन गेम शो व्हू वॉन्ट टू बी अ मिलॅनिअर (British Television Game Show, Who Want to be Millionaire) ह्याचे भारतात एका नव्या रूपात हिंदी भाषेत हा कार्यक्रम करण्याचे ठरले. २००० मध्ये कौन बनेगा करोडपतीचा पहिला सिझन सुरू झाला.

अमिताभ बच्चनचा भारदस्त आवाज, लोकांचे स्वागत करण्याची नवी स्टाईल, लोकांना अलविदा करण्याची नवी पद्धत, सर्व जाती धर्मियांना आपलेसे करणारी भाषा, प्रश्न विचारण्याची एक विशिष्ट पद्धत, खास देहबोली, लोकांमध्ये उत्सुकता वाढवण्याचे एक महत्त्वपूर्ण कौशल्य ह्यामुळे लोकांना आज काय होणार ह्याची उत्सुकता लागून राहत असे. शिवाय प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून करोडपती बनण्याची संधी, शिवाय घरबसल्या प्रश्नांची उत्तरे देऊन लाखो रुपये कमविण्याची स्पर्धा निर्माण करण्यामुळे ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने, एकाच वेळी करोडो करोडो लोक टीव्हीसमोर

बसून एकाच चॅनेलवर एकच कार्यक्रम पाहताना दिसले. टेलिव्हिजन सेक्टरमध्ये आजवर टेलिव्हिजन रेटिंग पॉईंटची सर्वाधिक मजल गाठली. संपूर्ण जगातील सर्वाधिक टीआरपी झालेला हा कार्यक्रम होता.

ह्या कार्यक्रमाची व्याप्ती एवढी वाढली की, २००० सालानंतर २००५, २०१० आणि २०११, २०१२ अशा सिझनमध्ये ह्या कार्यक्रमाने लोकांच्या आवडीचे आणि कार्यक्रम पाहण्याचे सर्व विक्रम मोडीत काढले.

'कौन बनेगा करोडपती' कार्यक्रमाने अमिताभ बच्चन ह्यांना जीवनदान मिळाले. त्यामुळे अमिताभ बच्चन आर्थिक अडचणीतून काही प्रमाणात बाहेर आले.

कौन बनेगा करोडपती कार्यक्रमाबरोबरच अमिताभ बच्चन ह्यांचे एकामागून एक चित्रपट आले आणि प्रचंड चालले. त्या चित्रपटांपैकी २००० मध्ये मोहबते, २००१ मध्ये एक रिश्ता, कभी खुशी कभी गम, २००३ मध्ये, बागबान २००० मध्ये, २००२ मध्ये आँखे, २००४ मध्ये खाकी आणि देव, २००५ मध्ये ब्लॅक, २००५ आणि २००६ मध्ये बंटी और बबली, सरकार, कभी अलविद ना कहना, बाबूल, २००७ मध्ये एकलव्य आणि निशब्द, चिनी कम, शूटआऊट ॲट लोखंडवाला, २००८ मध्ये भूतनाथ, सरकार राज, २००९ मध्ये पा, २०१० मध्ये तीनपत्ती, कंदाहर, २०११ मध्ये गॉड तुसी ग्रेट हो, बुड्ढा होगा तेरा बाप, आरक्षण, २०१२ मध्ये डिपार्टमेंट, २०१३ मध्ये The Great Gatsby, सत्याग्रह महाभारत, जमानत, २०१४ मध्ये भूतनाथ रिटर्न्स, तर २०१५ मध्ये शमिताभ, पिकू, वजीर.

ह्याशिवाय अनेक चित्रपटांमध्ये अमिताभ बच्चन ह्यांनी पाहुण्या कलाकाराच्या भूमिका केल्या आहेत. आजवर अमिताभ बच्चन ह्यांचे सर्वाधिक चित्रपट आले आणि सुपरहिट झाले. वयाच्या २७ व्या वर्षी अभिनय क्षेत्रात प्रवास सुरू करून ७३ वे वर्ष होत आले, परंतु अमिताभ बच्चन ह्यांच्या चाहत्यांची संख्या वाढतेच आहे आणि वाढतेच आहे. आजही अमिताभ बच्चन ज्या चित्रपटात असतील त्या चित्रपटात भलेही नायक कोणीही असो, खराखुरा नायक हे अमिताभ बच्चन यांनाच समजले जाते.

अमिताभ बच्चन ह्यांना अनेक पुरस्करांनी सन्मानित करण्यात आले.

अमिताभ बच्चन ह्यांनी फक्त अभिनयच नव्हे तर आपल्या गाण्यानेसुद्धा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आजवर त्यांना मानद डॉक्टरेटचा किताब झांशी युनिर्व्हसिटी (२००४),, दिल्ली युनिर्व्हसिटी (२००६), the de moutfort युनिर्व्हसिटी, in UK (२००६), लीड्स मेट्रोपोलिटन युनिर्व्हसिटी यॉर्कशायर, युके (२००७), Queenland university of Technology Australiy, २०११ २०१३ मध्ये जोधपूर नॅशनल युनिर्व्हसिटी.

अमिताभ बच्चन ह्यांनी २००२ मध्ये एक पुस्तक लिहिले Soul curry for you & me ह्यामध्ये तुमच्या जीवनात सर्वगुणसंपन्न बनण्याची सूत्रे लिहिली आहेत. भारत सरकारने अमिताभ बच्चन ह्यांना १९८४ मध्ये पद्मश्री आणि २००१ मध्ये पद्मभूषण पुरस्कारांनी सन्मानित केले. अशा प्रकारे डॉ. पद्मश्री, पद्मभूषण मा. श्री. अमिताभ बच्चन ह्यांनी जीवनदायिनी जशा प्रकारे खालीवर होत राहते अगदी तशाच प्रकारे विविध अडचणींना सामोरे जात जीवन यशस्वी केले.

अमिताभ बच्चनसारख्या व्यक्ती सहस्र वर्षातून एकदा जन्मतात. अशा ह्या सुपरहिट कलाकाराला महाराष्ट्राचा मानाचा मुजरा!

पद्मश्री, पद्मभूषण डॉ. अमिताभ बच्चन ह्यांनी सर्वांना आदर दिला आणि त्यांनी तो कितीतरी पटीने परत मिळावला. अमिताभ बच्चन ह्यांनी सर्वच क्षेत्रांतील व्यक्तींबरोबर नातेसंबंध जोपासले. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कटुता आणून दिली नाही, मग तो चहावाला असो, मेकपमन असो, हिरो असो, हिरॉईन असो किंवा चित्रपटात काम करणारा सर्वसाधारण कलाकार. सर्वांशीच अमिताभ बच्चन ह्यांनी उत्तम नातेसंबंध जोपासले. मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वच यशस्वी कलाकारांनी त्यांच्याबरोबर काम केले आहे. त्यामध्ये सचिन पिळगावकर असो, लक्ष्मीकांत बेर्डे असो, अशोक सराफ, नाना पाटेकर, रितेश देशमुख अशा सर्वांनीच त्यांच्याबरोबर काम केले आहे. एखाद्या नवोदित कलाकारांना अमिताभ बच्चन ह्यांच्या चित्रपटात अगदी पडद्यामागे जरी काम करायची संधी मिळाली म्हणजे सौभाग्याचे मानले जाते.

चित्रपटसृष्टीतील हिंदीतील सर्वच कलाकारांसाठी अमिताभ बच्चन बिग बी आहेत आणि येथून पुढेदेखील राहतील.

अमिताभ बच्चन ह्यांनी चित्रपटसृष्टीबरोबरच राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रांत नाते जोडले. राजकारणात अमिताभ बच्चन ह्यांनी गांधी घराण्यापासून ते अमरसिंग ह्यांच्या समाजवादी पार्टीबरोबर ते महाराष्ट्रातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे, उद्धवजी ठाकरे अशा सर्वांशीस उत्तम नातेसंबंध जोपासले.

खरे तर अमिताभ बच्चन हे एक झिरो २ हिरो असे व्यक्तिमत्त्व आहे.

चित्रपटसृष्टीत अमिताभ बच्चन ह्यांच्या कुटुंबातील कोणीही नव्हते. शिवाय अनेकदा अमिताभ बच्चन ह्यांची उंची व मोठा चेहरा ह्यांची खिल्ली उडवली होती, असे असतानादेखील निंदानालस्तीला बळी न पडता, सातत्याने केलेल्या प्रयत्नातून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यांनी प्रवेश करताना काही काळजीदेखील घेतली. सर्वप्रथम त्यांनी चित्रपटसृष्टीमध्ये उत्पन्न मिळेलच ह्याची खात्री नाही, त्यानुसार किमान २ ते ३ वर्षे सर्वसाधारण असे सर्व खर्च भागतील अशा पैशांची तरतूद करण्याकरिता सर्वप्रथम घरापासून दूर जाऊन कोलकत्त्यामध्ये मोठ्या पगाराच्या नोकरीची जबाबदारी स्वीकारली. ती जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्या नोकरीमधून मिळणारे उत्पन्न बचत खात्यात ठेवले. ही बचत आपल्या भविष्यासाठी उपयुक्त आहे, असा दूरगामी विचार केला. ह्यामधून अमिताभ बच्चन ह्यांची दूरदृष्टी दिसून येते.

तसेच मुंबईमध्ये आल्यावर, कोलकत्त्यामध्ये एका आलिशान घरात राहण्याची सवय व आलिशान राहणीमान ह्याचा त्याग करत, पैसे वायफळ वाया न घालवता, अगदी सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे इतर कलाकारांसोबत राहिले. सुरुवातीला चित्रपटसृष्टीमध्ये आपल्याला कोणत्याही चित्रपटात कसे काम मिळेल ह्यासाठी प्रयत्न केले. योग्य वेळी, योग्य ठिकाणी, योग्य निर्णय घेऊन योग्य व्यक्तीच्या सहकार्याने त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. चित्रपटांमध्ये सात हिंदुस्थानीत त्यांना जी भूमिका मिळाली, जी संधी मिळाली त्याचे सोने केले.

सुरुवातीला साहाय्यक भूमिका यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर, Plan my work (कामाचे नियोजन), Work my Plan (नियोजनानुसार) कृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चित्रपटसृष्टीमध्ये, कोणत्याही व्यक्तीचा पोर्टपोलिओ हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो, परंतु अनेक व्यक्ती त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यानुसार अमिताभ बच्चन ह्यांनी वारंवार आपला स्वत:चा पोर्टपोलिओ तयार केला, तो योग्य व्यक्तींपर्यंत पोहोचवला, तसेच तो पोर्टपोलिओ अपग्रेड केला, एका नायकाच्या भूमिकेतून त्यांनी एका नायकाचा पोर्टपोलिओ जसा असायला हवा तसा निर्माण केला.

एखादा निर्णय घेतला की घेतला, त्यामध्ये पुन्हा माघार नाही. निर्णय

घेतला की खरा करून दाखवण्यासाठी त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने योग्य ती मेहनत घेतली. नायक म्हणून सुरुवातीला त्यांना स्वीकारले गेले नाही परंतु त्यांनी नायक बनायचा निर्धार व ध्येय मागे पडू दिले नाही. एक यशस्वी नायक होण्यासाठी सातत्याने यशस्वी प्रयत्न केले आणि अखेरीस एक यशस्वी नायक झाले.

अमिताभ बच्चन ह्यांच्याकडे एक सर्वांत मोठी शक्ती आहे ती म्हणजे कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक भूमिकेतून पाहण्याची. ९० १० चा सिद्धांत हा प्रचलित आहे. १०% गोष्टी ह्या अनवधानाने कळतनक ळत आपल्या आयुष्यामध्ये घडत असतात, परंतु त्या गोष्टींकडे तुम्ही सकारात्मक की नकारात्मक भूमिकेतून पाहता त्यावर यश अपयश हे अवलंबून असते.

जे घडते त्या चांगल्यासाठीच. त्या भूमिकेतून घडलेल्या संघर्षाच्या घटनांकडे अमिताभ बच्चन ह्यांनी सकारात्मक वृत्तीने पाहिले. नोकरी करताना मानेचे दुखणे हे एक दिशादर्शकच आहे. नोकरी सोडून नवीन क्षेत्रात करिअर करण्याची, चित्रपटसृष्टीत काम करताना एक भयंकर अपघात झाला, तेव्हा अमिताभ अगदी मरणाच्या दारात उभे होते, परंतु सकारात्मक वृत्ती व प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर ते मरणाच्या दारातून बाहेर आले. त्यावर बाळासाहेब ठाकरे ह्यांनी एक व्यंगचित्र काढून पाठवले. त्या व्यंगचित्राचे शीर्षक होते 'आखिर यमराज हार गया.'

अपघातानंतर अमिताभ बच्चन पुन्हा नव्या उमेदीने राजकारणात उतरले आणि पहिल्याच निवडणुकीत खासदारदेखील झाले. खासदार म्हणून त्यांनी योग्य कार्य केले. परंतु राजकारणामध्ये खोटेपणाला ते बळी पडले नाहीत. एक सुप्रसिद्ध विचारवंत बील ग्राहम ह्यांनी म्हटले आहे.

When wealth is lost nothing is lost.
When health is lost something is lost.
When charactor is lost, all is lost.

ह्या पंक्तीनुसार अमिताभ बच्चन ह्यांनी आपले चरित्र्य काळजीपूर्वक सांभाळले, जपले, वाढवले, राखले.

राजकारणातील चिखलफेकीत, बोफोर्स घोटाळ्यात, राजकीय यशाच्या द्वेषाने अमिताभ बच्चन ह्यांचे नाव घातले. आपल्या चारित्र्यावर कोणीतरी

शिंतोडे उडवत आहे, हे लक्षात घेता अमिताभ बच्चन ह्यांनी खासदारपदाचा राजीनामा दिला. बोफोर्स घोटाळा प्रकरणी त्यांची निर्दोष मुक्तता झाली पण अमिताभ ह्यांनी मात्र राजकारणाला रामराम ठोकला. पुन्हा चित्रपटसृष्टीत नव्या जोमाने उतरले, मराठीमध्ये म्हण आहे, 'थांबला तो संपला.'

अमिताभ बच्चन कधीच थांबले नाहीत, ते सतत सकारात्मक वृत्तीने चालतच राहले. एबीसीएल ही कंपनी प्रचंड मोठे स्वप्न उराशी बाळगून उभारली. ती स्वप्ने मातीत मिळाली. होते नव्हते ते सगळे गेले, परंतु अमिताभ बच्चन  एबीसीएल सांभाळणाऱ्या पदाधिकाऱ्यांना उलट बोलले नाहीत.

स्वामी विवेकानंदांनी सांगितले आहे,

Be Bold, Be Strong,

Take whole responsibility on your shoulder & see you are creater of your own destiny.

त्यानुसार कर्जाचा डोंगर व अपयशाची सर्व जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेतली. कोलमडून न जाता, मोठ्या धाडसाने पुन्हा वयाची साठी जवळ असताना निवृत्ती घेतली. सर्वांची देणी दिली, कर्जाचा डोंगर उतरवला आणि कर्तृत्वाचा, चांगुलपणाचा, स्वच्छ चारित्र्याचा, उत्तम व्यक्तिमत्त्वाचा पुरस्कारार्थींचा मोठा डोंगर स्वकष्टाने उभा केला. अमिताभ बच्चन हे आकाशात चमकणाऱ्या स्टारपेक्षा अधिक मौल्यवान असे सुपरस्टार झाले आहेत.

अमिताभ बच्चन ह्यांनी स्वत:चा जीवन साथीदारसुद्धा योग्य निवडला, आपल्या जीवन साथीदारांच्या साहाय्याने संस्कारी, सुसंस्कृत म्हणून अभिषेक बच्चनला घडवले. विश्वसुंदरी झालेल्या ऐश्वर्या रॉय हिला बच्चन कुटुंबाची सून केली. सामाजिक क्षेत्रातसुद्धा अमिताभ बच्चन आपल्या विचाराने, परिवर्तन घडवताना दिसतात. अमिताभ बच्चन हे संपूर्ण श्रीमंतीचे जीवन जगले, त्यामध्ये शारीरिक श्रीमंती, मानसिक श्रीमंती, आर्थिक श्रीमंती, कौटुंबिक श्रीमंती, भावनात्मक श्रीमंती, पर्यावरणात्मक श्रीमंती, बौद्धिक श्रीमंती, सामाजिक श्रीमंती, आध्यात्मिक श्रीमंती, एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व म्हणून अमिताभ बच्चन ओळखले जातात. झिरो २ हिरो अ मिताभ बच्चन.

□



# Zero to Hero Journey of Amitabh Bachchan

# अमिताभ बच्चन असे घडले



यशराज पारखी





